## जगदिश खांदेवाले



# न्याय

## जगदिश खांदेवाले

ई साहित्य प्रतिष्ठान

# न्याय

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

न्याय (कादंबरी)

जगदिश खांदेवाले

फ्लॅट नं ११३ शिवशंकर सोसायटी.

शिवतीर्थ नगर कोथरुड पुणे ४११०३८

मो.नं ९१५८६६१६३८

Email id – jlkhandewale@gmail.com

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १६ जून २०२०

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

©esahity Pratishthan®2020

# मनोगत



ई - साहित्य तर्फे ' उद्यमी ' ही माझी कादंबरी प्रकाशित झाली होती. तिचे चांगले स्वागत झाल्याने मी ही दुसरी कादंबरी सादर करीत आहे. उद्यमीच्या निमित्याने एक लक्षात आले की वेगळा विषय असला तर वाचक जरूर स्वारस्य दाखवितो. ही कादंबरी पण वेगळ्या विषयावर आहे आशा आहे की वाचकांना जरुर आवडेल.


श्री. सुनील सामंत आणि ई- साहित्यची टीम यांच्या सहकार्याशिवाय हे शक्य झाले नसते. त्यांचे विशेष आभार.

मला मुळात मराठी आणि इंग्रजी वाचनाची आवड. आहे. पु. ल. देशपांडे, जयवंत दळवी हे मराठीतले आणि लियां उरीस, फ्रेडरिक फॉर्सिथ हे इंग्रजीतील लेखक विशेष आवडीचे. मराठी भाषेवर प्रेम असले तरी इंग्रजी लेखकांची तपशीलवार लिहिण्याची पद्धत ,मेहनत नेहमीच प्रभावित करते. लवकरच व्यवस्थापन विषयावर लिहिण्याचा मानस आहे.

जगदिश खांदेवाले

श्री जगदिश खांदेवाले यांचे ई साहित्यवरचे पहिले पुस्तक नक्की वाचा.

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/udyami_jagadish_khandewale.pdf



**या पुस्तकातील कथा पूर्णपणे काल्पनिक असून त्यातील कोणत्याही व्यक्ती, संस्था, स्थळे अस्तित्वात नाहीत. त्यांचे कोणाशी साधर्म्य आढळल्यास तो केवळ योगायोग मानावा.**

अर्पणपत्रिका

माझे नातू चि ओजस (वय वर्षे दहा) आणि चि विराज (वय वर्षे तीन)

यांच्या सहकार्या शिवाय मी एक शब्दही लिहू शकलो नसतो....

हजार लोकांची सभा आठ दहा जण उधळून लावू शकतात. खरे म्हणजे जमलेल्या लोकांचा नुसत्या हुंकाराने हे गर्भगळीत होऊ शकतात पण ते तसे करीत नाही म्हणूनच यांचे फावते. पगारवाढ आणि सवलती करता जागृत असण्याऱ्या संघटना, संस्थेतील गैरकारभाराबद्दल मौन बाळगून असतात. कोणी एकट्याने याविरोधात आवाज उठविल्यास त्याला गप्प करण्यात येते. गप्प झालाच नाही तर त्यालाच आरोपी ठरविण्यात येते आणि न केलेल्या गुन्ह्यासाठी तुरुंगात पाठविण्यात येते. दुर्जन व्यक्ती फार बुद्धिमान असतात असे काही नसते. सज्जन माणसे चाकोरी बाहेर वागत नाहीत, असंघटित असतात याचा गैरफायदा दुर्जनांना मिळतो एव्हढेच.

अशाच व्यवस्थेचा एक बळी, नरेन.

संधी एकदाच दार ठोठावते असे म्हणतात. नरेनने या संधीचा पूर्ण फायदा घेतला पण ते तेवढे सोपे नव्हते....

# न्याय

जगदिश खांदेवाले

<u>शिक्षा</u>

'ऑर्डर, ऑर्डर'न्यायाधीश हातोडा टेबलावर ठोकत म्हणाले त्याबरोबर कोर्टातील कुजबुज हळूहळू शांत झाली. सर्व शांत झाल्यावर त्यांनी निकाल वाचण्यास प्रारंभ केला. सादर केलेले साक्षीपुरावे लक्षात घेता आरोपी नरेन याने १५ लाख रुपयांची अफरातफर केल्याचे सिध्द होत आहे याकरिता आरोपी नरेन याला सात वर्षे सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यात येत आहे.

शिक्षा ऐकताच उपस्थित जनसमुदायाने नकळत ओह असा उद्गार काढला जो मला तरी शोकनिर्देशक वाटला कारण उपस्थित लोकांमधे माझ्याविषयी सहानुभूती असणारे लोक जास्त होते. मी सहज सगळीकडे नजर टाकली. मला फादर फ्रान्सिस चष्मा काढून डोळे पुसतांना दिसले. त्यांच्या जवळच फ्रेनी बसली होती. ती वरकरणी तरी शांत वाटत होती. माझ्या चाळीतली मंडळी पण हजर होती. सर्वांचे चेहरे खिन्न दिसत होते.

"तू काही काळजी करू नकोस"सरवटे, माझे वकिल म्हणाले" आपण हायकोर्टात अपील करू".

मी जळजळीत नजरेने त्यांच्याकडे बघितले व नको एवढेच म्हणालो.

"अहो तो कशाला अपील करेल, त्याऐवजी बाहेर आल्यावर आरामात लपवून ठेवलेल्या पैशावर मजा करेल" इन्स्पेक्टर सावंतांनी तारे तोडले.

'आहे, एकतरी विरोधात बोलणारा आहे' मी मनात म्हणालो पण उघडपणे मात्र 'काय सावंत साहेब तुम्हीपण' एवढेच म्हणालो. तेवढ्यात फादर व फ्रेनी आमच्याकडे येतांना दिसले. जवळ येताच फादर हळूच सावंतला म्हणाले मी दोन मिनिटे नरेनशी बोलू शकतो काय? सावंत किंचित नाखुशीनेच बाजूला झाले. माझे हात हातात घेत फादर म्हणाले धीर सोडू नको. देव दयाळू आहे. मी एव्हाना या आश्वासनाला विटलो होतो. काही न बोलता मी हलकेच त्यांचे हात बाजुला केले.

“मी वाट बघत आहे” फ्रेनी स्फुंदत म्हणाली. मी डोळे मिटून घेतले तेवढ्यात व्हॅन आली व आम्ही कारागृहाकडे रवाना झालो.

---

## कॉलेज

व्हॅन सुरू होताच मला कॉलेजचे दिवस आठवले. बारावीत चांगले मार्क होते, माझे डिग्री करायचे नक्की होते. मला शिक्षणाची आवड होती हे खरेच पण खर्चाचे काय हा प्रश्न होताच. घरी फक्त आई होती जिने आतापर्यंत कष्ट करून मला शिकविले होते अर्थात् चाळीत असल्यामुळे हे शक्य झाले पण आता फीचा प्रश्न होता. अगदी सरकारी कॉलेजची फी पण भरणे आम्हाला शक्य नव्हते. आईचा विद्यार्जनावर अतुट विश्वास होता. शहरात सेंट पेटीट हे पण एक नावाजलेले कॉलेज होते पण खाजगी असल्याने त्याची फी जास्त होती. खरे म्हणजे ते धनिकांचे कॉलेज म्हणूनच प्रसिध्द होते.

काय करावे या विचारात असताना शेजारचे भिडेकाका आले. 'काय नरेन, ॲडमिशनचे काय ठरवले?' त्यांनी विचारले

'काय ठरवणार काका, शेवटी पैशापाशी गाडी अडली बघा ' आई म्हणाली.

'असा धीर सोडू नका वहिनी, इतकी वर्ष कष्ट केले अजून तीन वर्ष कळ काढा '

'सगळी सोंग आणता येतील पण पैशाचं कस आणणार?'

'नरेन, मी काय म्हणतो, एकदा सेंट पेटिटला जाऊन तर चौकशी कर'.

'कशाला, नकार ऐकायला?'

‘तसे म्हण हवेतर, पण आपण गृहितच धरत आहोत की तिथे काही सवलती नाही प्रत्यक्ष गेल्यावर कदाचित जास्त माहिती कळेल '.

‘ठीक आहे काका, मी आताच जातो '

मी कॉलेजला पोचलो तेव्हा फारतर सकाळचे नवू वाजले असतील. कॉलेजचा परिसर बघून मी थक्कच झालो. सुंदर ब्रिटिशकालीन तीन मजली इमारत, भलामोठा पोर्च, आजूबाजूला सुरेख बगीचा, खरंच इथे प्रवेश मिळाला तर किती छान होईल. अशा विचारात गढून गेलो असता मी ऑफिसपर्यंत पोचलो. अजून ऑफिस पण उघडले नव्हते. तसे प्रवेश सुरू झाले नव्हते पण फॉर्म द्यायला सूरूवात झाली होती एवढेच मला माहिती होते. फॉर्म घेण्या आधी निदान प्रिन्सिपॉल ना भेटून फी माफीची विनंती करू असा विचार करून मी त्यांची केबिन शोधू लागलो तोच मागून एका स्त्रीचा आवाज आला. एक थोडी ठेंगणी आणि त्यामुळे किंचित जाडसर वाटणारी बाई मला विचारत होती. तिच्या आवाजातच्या अधिकारवाणीमुळे ती कोणीतरी कार्यालयीन व्यक्ती किंवा प्राध्यापक वगैरे असावी असे वाटले.

” तुला कोणाला भेटायचे आहे?”

“प्रिन्सिपॉल”

“कशाला? प्रवेशासाठी असल्यास मेरिटप्रमाणेच प्रवेश मिळेल”.

“नाही, मला फी माफ होईल काय हे विचारायचे आहे”.

“काय?” तिने किंचित आश्र्चर्याने विचारले “हे खाजगी कॉलेज आहे. इथे फी माफी, सवलत असे काही नाही”

“ मला कल्पना आहे. पण वाटले विचारून तर पाहू “एव्हाना माझी भीड चेपली होती म्हणून मी तिलाच विचारले “तुम्हाला काय वाटते मॅडम?”

“तुझी मार्कलिस्ट बघू” तिने विचारले. मार्क वाचताच पटकन म्हणाली “छान आहेत यावर तुला सरकारी कॉलेजमधे सहज प्रवेश मिळेल”.

“फी तर मी तिथली पण भरू शकत नाही आणि मला इथेच शिकायचे आहे कारण इथले प्राध्यापक फार नामवंत आहेत”

“ते सर्व खरे असले तरी फीचा प्रश्न आहेच” माझी मार्क लिस्ट परत देत ती खेदाने म्हणाली “आता तू काय करायचे ठरविले आहेस?”

मार्कलिस्ट परत घेत मी उसन्या अवसानाने म्हणालो “फारतर माझे हे वर्ष वाया जाईल पण मी काही काम करून पैसे साठवेन पण इथेच प्रवेश घेईन. पण कोणत्याही परिस्थितीत मी शिकेनच ”

“That’s the sprit, तुझा आत्मविश्वास बघून मला फार छान वाटले. जर तुझी कोणतेही काम करायची तयारी असेल तर मी तुला थोडी मदत करू शकते”.

“मॅडम, मी आतापर्यंत पेपर टाकण्यापासून ते हमाली करण्यापर्यंत अशी सर्व कामे केली आहेत तेव्हां तुम्ही फक्त कोणाला भेटायचे एवढेच सांगा”. मी अधिरतेने म्हणालो

तिने खिडकीकडे हात केला व दूर दिसणारे चर्च दाखवून म्हणाली “त्या चर्चचे फादर फ्रान्सिस यांना जाऊन ताबडतोब भेट. तेच तुला मदत करू शकतात, मी त्यांना फोन करून तू येत असल्याचे सांगते आणि हो नंतर काय झाले हे मला जरूर सांग”.

तिचे वाक्य पूर्ण व्हायच्या आत मी चर्चच्या दिशेने पळत सुटलो होतो. काय घडले ते सांगायला कुठे यायचे तेही विचारले नाही. त्यांचे नावही विचारले नाही.

खिडकीतून जवळ वाटणारे चर्च चांगलेच दूर निघाले. कोण काय म्हणेल याची पर्वा न करता मी धावतच होतो. चर्च गाठेपर्यंत मी चांगलाच घामाघूम झालो होतो. तेथे पोचताच मला फादर फ्रान्सिस आवारातच भेटले. साठहून वय कमी असले असले तरी त्यांच्या हालचालींत एक ठहराव होता. त्यामुळे वय जास्त वाटत होते.

मी काही बोलायच्या आतच त्यांनी माझ्या खांद्यावर हात ठेवला व अगदी हळुवार आवाजात ’अरे पळत यायची काय गरज होती? ’ अशी विचारणा केली व मला ऑफिसमधे बसवले व पाणी दिले.

नंतर माझ्याकडे जरा करुणेने बघून म्हणाले “मला आताच अपर्णाचा फोन आला होता. तिने मला तुझ्याबद्दल सर्व सांगितले आहे”

यावर काय बोलावे हे न सुचल्याने मी काहीच बोललो नाही. टेबलावरील पेपरवेट सहज उचलून गोल फिरवित ते पुढे म्हणाले “नरेन, त्याचे असे आहे की माझ्याकडे काम जरुर आहे पण त्या कामाकरता तू फार लहान आहेस म्हणून तुला ते देणे मला बरोबर वाटत नाही”.

झाले, मला काहीतरी धपकन खाली पडण्याचा भास झाला.

“असे नका म्हणू फादर, माझे शिक्षण यावर अवलंबून आहे” मी कळवळून म्हणालो “निदान मला काम काय ते तरी सांगा”.

“असे म्हणतोस? ठीक आहे, चल माझ्याबरोबर. कदाचित काम बघितल्यावर तूच स्वतःहून नकार देशील”असे म्हणत आम्ही दोघे चर्चमध्ये गेलो. आतल्या बाकांकडे, दरवाजे व खिडक्या हात दाखवित यांची साफसफाई व किरकोळ दुरुस्ती असे म्हणत वेदिकेच्या मागील बाजूने थोड्या अंतरावर असलेल्या दफनभूमीकडे चालू लागले. तिथे पोचताच समोरील अंदाजे तीनशे कबरीकडे निर्देश करीत म्हणाले की यांची देखभाल पण करावी लागेल.

“म्हणजे नक्की काय?”

“साफसफाई व धुणे अर्थात् रोज सर्व नाही पण मी सांगेन कोणत्या क्रमाने ते” असे म्हणत ते नकाराच्या अपेक्षेने माझ्याकडे बघू लागले.

क्षणाचाही विचार न करता मी त्यांना मी तयार असल्याचे सांगितले.

“ अरे, अशी घाई करू नकोस, घरी आईला पण विचार”

त्याची काही गरज नसल्याचे मी शांतपणे सांगितले त्यावर काहीच न बोलता ते ऑफिसकडे चालू लागले. तेथे पोचल्यावर ते एक कागद घेवून काही आकडेमोड करू लागले तेवढयात एक पन्नाशीची स्त्री घरातून बाहेर आली. तिचे चालणे जमिनीला चिरडत असल्याप्रमाणे दमदार होते. आम्हा दोघांकडे निरखून

बघत तिने कुठे गेला होता असे विचारले पण फादर आकडेमोड करण्यात मग्न होते म्हणून तिने जरा मोठ्या आवाजात परत विचारताच फादर पटकन भानावर आले व त्यांनी याला काम दाखवत होतो असे सांगितले व ते परत आकडेमोड करू लागले.

तिने त्यांचा नाद सोडला व सरळ मलाच नाव विचारले व काय काय काम समजले हे विचारले. मी पण थोडक्यात सांगितले. पण तेवढ्याने तिचे समाधान झाले नाही. याशिवाय हे करावे लागेल, ते करावे लागेल असे ती सांगू लागली. तेवढ्यात बहुधा फादरची आकडेमोड संपली असावी. काय चालले आहे हे लक्षात येताच ते पटकन तिला म्हणाले

"व्हायोला, आता पुरे. तो विद्यार्थी आहे व रोज फक्त चार तासच काम करणार आहे" मला उद्देशून ते पुढे म्हणाले "नरेन, ही व्हायोला, माझी लहान बहीण. मी नसताना ही तुला काम सांगेल"

"फ्रान्सिस, याला काय हे काम झेपणार आहे काय? मी सांगते चार दिवसात हा पळून जाईल "

"कदाचित, म्हणून आपण त्याचे एक आठवडा काम बघू, जर समाधानकारक वाटले तरच पुढच्या गोष्टी "असे म्हणत ते मला म्हणाले "नरेन, तुझी काही हरकत?"

"नाही "

"मग ठीक आहे" असे ते समाधानाने म्हणाले

नंतर हातातील कागदाकडे एक नजर टाकून पुढे म्हणाले

“आता काही महत्त्वाच्या गोष्टी, मी सर्व प्रकाराने चेक करून बघितले पण नरेन तुला महिन्याला जास्तीत जास्त ₹५०० मिळतील, म्हणजे कॉलेजच्या फी व्यतिरिक्त आणि तुला कमीत कमी ७०% गुण दरवर्षी मिळवावे लागतील अन्यथा सवलत बंद होईल ”. माझा कानावर विश्र्वासच बसेना. मी आश्चर्याने ‘काय?’ म्हणताच त्यांना तो निराशेचा उद्गार वाटला म्हणून ते प्रांजळपणे परत म्हणाले की खरंच मी जास्तीत जास्त प्रयत्न केला पण एवढेच शक्य आहे.

माझी एवढीपण अपेक्षा नाही हे देवमाणसाला कसे सांगावे या विचारात मी असता व्हायोलाने माझे काम हलके केले.

“याची काहीच गरज पडणार नाही कारण दोन दिवसात हा पळून जाईल” एव्हढे बोलून ती फणकाऱ्याने निघून गेली. ती गेल्याच्या दिशेनी बघत फादर मला हळूच म्हणाले “नरेन, तिचे बोलणे मनावर घेऊ नकोस. तशी ती मनाने फार प्रेमळ आहे, Only sometimes Viola is violent”

आपल्याच नर्मविनोदावर त्यानी थोडेसे स्मित केले पण माझ्यासमोर असे बोलणे योग्य नव्हते असे वाटल्याने त्यानी पटकन विषय बदलला.

“अरे हो, तुझी कामाची वेळ कॉलेज सुटल्यावर दुपारी २ ते ६ अशी राहील. मग उद्यापासून सुरुवात करायची काय?”

“आता ११ वाजलेत. मी आजच सुरुवात करतो”

“ठीक आहे. मी दुपारी नसेन कारण मी तीन दिवसाकरता बाहेरगावी जात आहे. व्हायोला तुला काम सांगेल तेही एकप्रकारे बरेच झाले. पण तू एकदा घरी आईला विचार”

हा माणूस सगळ्यांची किती काळजी करतो असा विचार माझ्या मनात आला. पण उघडपणे मी ती नाही म्हणणार नाही एवढेच म्हणालो.

तसा माझ्यापुढे पर्याय तरी काय होता?

---

## काम

मी पळत कॉलेज गाठले व अपर्णा मॅडमला शोधून काढले व भेटून काय झाले ते सांगितले. तशी त्याची काही गरज नव्हती कारण फादरनी आधीच तिला फोन केला होता. पण मी सांगितल्यावर तिला जरा बरे वाटले. आता तुझ्यावरच सर्व अवलंबून आहे असे म्हणून तिने मला कॉलेज सुरू झाल्यावर परत भेट असे सांगितले.

मी तसेच पळत घर गाठले व आईला सर्व वृत्तान्त सांगितला. कामाचे स्वरुप ऐकून तिला थोडे वाईट वाटले पण पर्याय नसल्याने तिने काही नाराजीने का होईना पण होकार दिला. हे ही दिवस जातील असा तिला दिलासा देऊन मी पटकन जेवण आटपले व दोन वाजता परत चर्च गाठले. फादर बहुधा गावी गेले असावे कारण व्हायोलानेच स्वागत केले. काही न बोलता तिने मला सरळ चर्चमध्ये नेले. तेथील प्रत्येक लाकडी बाक दाखवित ती म्हणाली की हे सर्व बाक जुने झाले आहेत, काहींचे खिळे वर आले आहेत तर काही डगमगत आहेत, या सर्व किरकोळ दुरूस्त्या करणे हे तुझे पहिले काम. मी सर्व बाक नीट निरखून बघितले. हे सर्व करण्यासाठी काही हत्यार व सामान लागेल असे म्हणताच तिने वर्क शॉप अशी पाटी असलेली एक छोटी खोली दाखविली व या खोलीत तुला पाहिजे ते मिळते काय ते बघ आणि काम सुरू कर असे सांगितले व ती तिच्या कामाला निघुन गेली.

तिची नाराजी तिच्या देहबोलीतूनच स्पष्ट होत ती होती. मी पण काही न बोलता सर्व हत्यारे तपासली. बरीच सुस्थितीत होती. सर्वच शॉपमध्ये असतो तसा खिळे, बोल्ट, नट, स्क्रूचा ढीग पण मला मिळाला. चाळीतल्या बबन सुताराकडे शिकलेले वरकड काम एकदा आठवून मी कामाला सुरुवात केली. एकूण पन्नास बाक होते. त्यातले किरकोळ दुरुस्तीवाले प्रथम घेतले. जे जागीच ठीक करता आले ते केले. थोड्याच वेळात मी इतका कामात मग्न झालो की वेळेचे भान पूर्ण विसरलो. मध्यंतरी व्हायोला येऊन गेली असावी पण माझे लक्षच नव्हते. शेवटी सहाच्या सुमारास मी भानावर आलो व पटकन आवरासावर करू लागलो. तोच व्हायोला आली व माझ्याकडे कटाक्ष टाकून किती काम झाले हे बघू लागली. तिने दुरुस्त केलेला प्रत्येक बाक काळजीपूर्वक तपासाला. मी लक्ष नसल्यासारखे दाखवित सर्व झाडून स्वच्छ केले, हत्यारे जागेवर ठेवली, बाहेरच्या नळावर हातपाय धुतले. त्यानंतर तिला उद्या जरा लवकर आले तर चालेल काय असे विचारण्यासाठी गेलो.

"मी तुला तेच सुचविणार होते" ती बाके तपासतच म्हणाली.

"फारच चोखंदळ" मी मनातच म्हणालो पण उघडपणे मला कॉलेज सुरू व्हायच्या आत हे संपवायला आवडेल एवढेच म्हणालो.

मी येतो असे सांगून निघते वेळी सहज तिला विचारले की मी तुम्हाला काय म्हणू?

"तू मला दिदी म्हणत जा आणि एकेरीत बोलला तरी चालेल. " ती शांतपणे म्हणाली.

बहुधा बर्फ वितळत आहे असे मनात म्हणत मी घरी गेलो.

नंतरचे दोन दिवस मी सर्व सुतारकाम पूर्ण केले. मी सफाईदारपणे काम करीत आहे याची एकदा खात्री पटल्यावर दिदीचे लक्ष ठेवणे आपोआपच कमी झाले. बबनदादाकडे शिकलेला हरहुन्नरीपणा असा अचानक कामी आला. चर्चला असल्या किरकोळ कामासाठी कोणी मिळत नसेल हे पण एक कारण असू शकते.

अगदी कोंबड्यांचे खुराडे पण दुरुस्त झाल्यावर मी दिदीला थोडेसे वॉर्निश मिळेल काय ते विचारले. काय कोठून जाणे तिने जवळपास एक लिटर आणून दिले. पुरेसे नव्हते पण आहे ते वापरल्यावर जरा केलेल्या कामाला झळाळी आली. त्यानंतर मी चौथे दिवशी दीदीला विचारून काचा पुसण्याचे काम सुरू केले. बरेच दिवस स्वच्छ न केल्याने धुळीचे थर साठले होते. ते मी पाणी वापरून काढीत असतांना फादर आले. चर्च मध्ये झालेला बदल त्यांच्या पटकन लक्षात आला व ते आनंदाने म्हणाले "अरे वा, नरेन, तू तर एकदम चकाचक केले"

"अजून बरेच करायचे आहे"

"ठीक आहे, हे झाले की मी कबरीचे काम दाखवेन"

थोड्याच वेळाने आम्ही दोघेही सेमिटरीत पोचलो. तेथे साधारणपणे ३०० कबरी असतील. काही फार जुन्या होत्या. त्यांचे बांधकाम बरेच निखळलेले होते पण बऱ्याच सुस्थितीत होत्या. काहींच्या भोवती झुडपे वाढली होती. ते दाखऊन ते म्हणाले यांची साफसफाई व दुरुस्ती झाल्यावर रोज धुणे. हे रोज दोन तास करायचे नंतर चर्च मध्ये दोन तास काम. जमेल ना? नंतर त्यांनी मिस्किलपणे पुस्ती जोडली

येथील तुझे सर्व क्लायंट जमिनीखाली ६ फूट आहेत आणि बिचारे काही तक्रार करणार नाहीत.

झाले, नंतर तीन दिवस मी क्लायंटचे काम करीत होतो.

आठवड्यानंतर मी काम आटपल्यावर फादर ऑफिसमध्ये असतांना त्यांना भेटलो व मी काम सुरू ठेवायचे काय ते विचाराले.

क्षणभर माझ्याकडे रोखुन बघत त्यानी व्हायोला अशी जोरात हाक मारली. ती येताच त्यांनी तिला उद्यापासून नरेन ऐवजी परेरा कामावर येणार आहे तुझी काही हरकत तर नाही ना असे विचारले.

एक मिनिट माझ्या काळजाचा ठोकाच चुकला. पण मी काही बोलायच्या आतच व्हायोला शांतपणे उद्गारली “नरेनऐवजी कोणीही आलेले मला चालणार नाही”एवढे बोलून ती तडक आत निघून गेली.

बर्फ पूर्ण वितळला होता.

ती आत जाताच फादर माझ्याकडे बघून हसत म्हणाले

“कशी वाटली माझी कामाचे सर्टिफिकेट मिळवायची पद्धत?

'खतरनाक'मी मनाशीच म्हणालो.

‘बर ते ठीक आहे. आता फॉर्म मिळायला सुरवात झाली असेल तर हे पैसे घे व ताबडतोब फॉर्म भरून अपर्णाकडे दे”.

(त्यावेळी माझ्या लक्षात आले नाही पण फादर आणि अपर्णा या दोघांनी मिळून माझी फी भरली होती. कॉलेज किंवा चर्च या कोणाची कसलीही सवलत योजना नव्हती. )

---

## कॉलेज

नंतर दोन आठवड्यात कॉलेज सुरू झाल्यावर माझी खरी धावपळ सुरू झाली. सकाळी पेपर टाकणे व आठ वाजता कसेबसे कॉलेजला पोचणे, दीड वाजता पळत चर्च गाठणे, दोन ते सहा तेथील कामे करणे व सात वाजता घरी येणे यात मी इतका गुंतलो की कॉलेजमध्ये कोणाशीही मला ओळख करून घ्यायला पण जमले नाही.

साधारण एका आठवड्यात माझा बारावीच्या मार्का बद्दलचा गर्व उतरला. कारण जे शिकवणारे प्राध्यापक होते ते इतक्या उच्च दर्जाचे होते की हे फक्त इंग्लिशमधे बोलत आहेत एवढेच मला कळायचे. त्यातून माझे पेठेतले इंग्रजी, बोलायचा संकोच, काही शंका विचारावी तर सगळे हसतील ही कायम मनात भीती म्हणून माझा सुरुवातीचा उत्साह हळुहळु मावळायला लागला.

या कॉलेजमध्ये स्टडी सर्कल म्हणून एक चांगला प्रकार होता. त्यात विद्यार्थ्यांचे छोटे ग्रुप करून त्या ग्रुपला अभ्यासात प्राध्यापकांनी मदत करावी अशी मूळ संकल्पना होती. पण सर्व चांगल्या योजनांची जशी योग्य पुढाकार नसला तर वाट लागते तशी या योजनेची पण वाट लागली होती. कारण प्राध्यापकांचा निरुत्साह. हे जास्तीचे काम कोणालाही नको होते. परिणामी माहिती नसलेले माझ्यासारखे काही विद्यार्थी सोडल्यास सर्कलच्या मीटिंगला कोणी ही यायचे नाही. ही मीटिंग रविवारी असायची. अशाच एका रविवारी वाट बघत असता रॉनी व फ्रेनीची

ओळख झाली. योगायोगाने आम्ही एकाच ग्रुप मध्ये होतो. कोण्या सिनियरने वेळेवर तास घेवून वेळ मारून नेली होती. आम्हाला जे आधीच कळत नव्हते ते अजूनच कळेनासे झाले होते.

“चला, कॅन्टीनला जाऊन चहा तरी घेऊ” रॉनीने प्रस्ताव मांडला.

तेथे गेल्यावर फ्रेनी सहज मला म्हणाली “तू नेहमी घाईत येतो आणि जातो. का बरं?”

“काम असते” मी मोघम उत्तर दिले.

“रोज?”

“होय”

तेवढ्यात चहा आला म्हणून प्रश्न थांबले.

“या विषयाचं काय करायचं?” माझा बाळबोध प्रश्न ऐकून रॉनी बेफिकिरीने म्हणाला

“अजून परीक्षा दूर आहे. बघू नाहीतर क्लास आहेच”

“क्लासमधे पण नाही कळले तर?”

“तो जिममधे अभ्यास करेन” फ्रेनी गमतीने म्हणाली.

“तू काय करणार?” मी विचारले.

“सरांचा प्रत्येक शब्द मी नोट डाऊन करते. बघते परत परत वाचून”

ही माझ्याकरता बातमीच होती. कारण हा पिरेड आठ वाजता असल्याने माझा बरेचदा चुकायचा.

“मला जरा नोट्स देते काय? मी प्रयत्न करून बघतो. ”

“जरूर, काही समजले तर मला सांग”

“मलापण” इती रॉनी.

मी त्या नोट्सच्या झेरॉक्स काढल्या.

नंतर सावकाश वाचू असा विचार करून मी परत कामाला लागलो. आता पावसामुळे कबरी धुण्याचे काम तात्पुरते बंद होते व चर्च मधील सर्व कामे आता सरावाने मी लवकर आटपू शकत होतो म्हणून मी ऑफिसमध्ये अभ्यास केला तर चालेल काय असे दिदीला विचारले. तिची अर्थातच काही हरकत नव्हती. मी तेथे बसूनच फ्रेनीच्या नोट्स वाचू लागलो. तिने सरांचे प्रत्येक अक्षर लिहिले होते एवढा फरक सोडल्यास माझी प्रगती शून्य होती. काहीश्या निराशेनीच मी वही खाली आदळली तोच दिदी आली.

“कारे, वहीवर का राग काढतो” तिने विचारले.

“मग काय करू, काहीच कळत नाही”.

“बघू तरी, एवढा काय गहन विषय आहे” तिने वही उचलली व चाळायला सुरुवात केली” ओ हो, अकाऊंटन्सी माझा आवडता विषय”.

मी दचकलो. ” म्हणजे?”

“मी कॉमर्सची पदवीधर आहे ”

“पण तू तर ”..

“चर्च,चा सर्व हिशेब मीच बघते ”

“दिदी मलापण जरा हा विषय शिकव ना प्लीज”

“मला प्रथम हे सांग तुझ्या स्वतःच्या नोट्स का नाहीत?”

त्यावर मी तिला सकाळी पेपर टाकण्याच्या कामामुळे मी पहिला पीरेड कसा करू शकत नाही हे विस्ताराने सांगितले.

“मग नोट्स देण्यापेक्षा तुझी मैत्रीण तुला समजावून का सांगत नाही?”

“कारण तिलाच काही समजले नाही”

“बरं ठीक आहे” असे म्हणत तिने पहिलेच प्रकरण मला नीट समजावले. फंडा एकदा समजल्यावर नंतरचे सोपे वाटले. मला कितपत कळले ह्याची खात्री मी रॉनी व फ्रेनीला परत सांगून केली

“Wonderful, हे तर फारच सोपे आहे” ईती फ्रेनी

पण आपण कॉलेज सुटल्यानंतर अभ्यास करू ही त्यांची सूचना मी कामामुळे मान्य करू शकलो नाही. मधल्या सुट्टीत किंवा ऑफ पिरेडला आम्ही एकत्र बसून काय समजले नाही ते मार्क करायचो, ते मी दिदीला विचारून दुसऱ्या दिवशी त्यांना सांगत असे.

इकडे काम पण उत्तम चालले होते. रोजच्या निगराणीमुळे चर्चमधे लक्षणीय बदल रविवारी प्रार्थनेला येण्याऱ्या भाविकांना वाटू लागला होता. सेमिटरी पण अगदी पिकनिक स्थळ नव्हे पण नेटके दिसत होते. हे एखाद्या परिचिताकडून ऐकले की फादर अगदी आवर्जून ही आमच्या नरेनची मेहनत असे बजावून सांगत.

बघता बघता तीन महिने उलटले आणि तिमाही परीक्षेच्या तारखा जाहीर झाल्या. जशी परीक्षा जवळ येऊ लागली तशी फ्रेनी मला रोजच थांबण्यास सांगू लागली जे मला अशक्य होते. त्यामुळे ती जरा नाराज होत असल्याचे मला जाणवत होते रॉनी याबाबत जास्त आग्रही नव्हता पण थोडा नाराज जरूर होता. याच वातावरणात परीक्षा झाली. अपेक्षेप्रमाणे पेपर छान गेले. फक्त सत्तर टक्क्याची धाकधूक मनात होती. निकालाच्या दिवशी मी नोटीस बोर्ड समोरील गर्दीत मुसंडी मारून घुसलो. मला चक्क पंच्याहत्तर टक्के मार्क मिळाले होते व कॉलेजमध्ये दुसरा क्रमांक आला होता. फ्रेनीला पासष्ट तर रॉनिला साठ टक्के मार्क असल्याचे पण मी चेक केले व सुटकेचा निःश्वास टाकत गर्दीबाहेर आलो. एकवार सगळीकडे बघितले पण रॉनी व फ्रेनी काही दिसले नाही म्हणून सरळ चर्चला जावे असा विचार करीत असतांनाच उजवीकडून रॉनीने व डावीकडून फ्रेनीने माझे हात पकडले.

'काय स्कॉलर, आम्हाला चुकवून पळत होता काय?'फ्रेनी

 'कॉलेज मध्ये टॉपला यायचे होते म्हणून आमच्याबरोबर अभ्यास करणे टाळत होतास, खरे आहे ना? 'रॉनी.

जाब विचारता विचारता नकळत त्यांचा हातावरील दाब वाढला व मी वेदनेने विव्हळलो.

‘उगीच नाटक करू नकोस. एवढे आम्ही नकोशे होतो तर स्पष्ट सांगायचे, आम्ही नसतो आलो तुझ्या मार्गात ‘फ्रेनी.

‘मार्गात? अग, हा तर आपल्याला घरी पण बोलवत नाही ‘असे बोलतांना रॉनीचे लक्ष सहज स्वतःच्या हाताकडे गेले. हाताला रक्त लागले होते. ते बघून तो चपापला व मला घाबरून विचारू लागला की हे रक्त कसले? हळुवारपणे माझा हात सोडवून घेत मी म्हणालो ‘दोन दिवसापुर्वी विटा उतरवून घेतांना हातांना बारीक जखमा झाल्या होत्या त्याचे हे रक्त आहे ‘

‘म्हणजे?'

‘म्हणजे मी मोलमजुरी करून शिकतो. तुम्ही समजता तसा माझा काही बिझिनेस वगैरे काही नाही. सकाळी पेपर टाकण्यापासून माझ्या दिवसाची सुरुवात होते. त्यामुळे माझा बरेचदा पहिला पिरेड पण चुकतो '

‘काहीतरीच काय ‘फ्रेनी

‘मी गंमत करत नाही. बरेचदा तुम्हाला सांगायचा मी प्रयत्न केला पण तुम्ही ऐकूनच घेत नव्हता ‘मी कळवळून म्हणालो. ‘माझी परिस्थिती फारच खराब आहे. कॉलेज सुटल्यावर पण मी थांबत नाही कारण मी चर्च मध्ये सफाई व सेमिटरीत कबरी धुवायला जातो '.

आता मात्र दोघांचेही चेहरे जरा उतरले. फ्रेनी तर रडायलाच लागली.

'नरेन, तू गंमत करत आहे ना? 'तिने रडतच विचारले.

' अजिबात नाही. पूर्ण सत्यच ऐकायची हौस होती तर पूर्ण ऐकायची हिम्मत पण ठेव 'असे म्हणत मी जेवणाचा डबा रॉनीसमोर उघडला 'हे माझे सकाळचे जेवण. आता रात्री आठपर्यंत मी काही खायचा विचार पण करू शकत नाही आणि यामुळेच मी कॅन्टीनला तुमच्याबरोबर येत नाही '.

' नरेन, आता पुरे कर '

'झालेच आहे. फक्त एकच गोष्ट सांगायची राहिली. ती पण सांगतो 'मी शांतपणे म्हणालो 'तुम्हाला मी कधी घरी बोलवत नव्हतो कारण माझे घर इतके लहान आहे की तुम्ही दोघेही जर एकदम आलात तर मला बाहेर उभे रहावे लागेल'.

मनात साठलेले सर्व बोलून टाकल्याने मला आता बरेच मोकळे वाटत होते. आता काही ही दोघेही आपल्याशी संबंध ठेवणार नाही म्हणून थोडेसे वाईट पण वाटत होते.

इकडे फ्रेनीचे मुसमुसणे काही थांबत नव्हते आणि रॉनी एकटक हातातल्या डब्याकडे बघत होता. आमच्या झटापटीत माझ्या वह्या खाली पडल्या होत्या त्या मी उचलल्या व येतो असे पुटपुटत मी जाऊ लागलो.

तेवढ्यात भानावर येत फ्रेनीने मला अडवले. ‘नरेन, आमचे चुकले आम्हाला माफ कर '

‘काहीतरीच काय फ्रेनी, चुकले ते माझे. कधी ना कधी हे होणारच होते. बरे झाले मला माझी जागा कळली '

‘अबे ओ स्कॉलर, खूप बोलला.. आता एक शब्द जरी बोलला तर थोबाड फोडेन ‘आता रॉनीला कंठ फुटला ‘हीच आमची किंमत केली काय? मित्रांना काय एवढेपण बोलायचा अधिकार नसतो काय? शेवटी मित्र कशाकरता असतात?'

आता जास्त ताणून धरण्यात काही अर्थ नव्हता म्हणून मी फ्रेनीला रडणे थांबव असे सांगून चला कॅन्टीनला जावून बोलू असे म्हणालो त्यावर रॉनी म्हणाला की आता कॅन्टीनला जावेच लागणार आहे कारण माझे भाषण चालू होते तेव्हा त्यानी माझा डबा खाल्ला होता.

मी कपाळाला हात लावला व आम्ही तिघेही कँटींनकडे चालू लागलो.

उगीच खोटे कशाला सांगू? या दोघांबाबत माझा अंदाज चुकल्याने मला आनंदच झाला होता.

कॅन्टीनला पोचल्यावर रॉनीने सर्व सूत्रे स्वतःच्या ताब्यात घेतली. ते स्वाभाविकच होते कारण कॅन्टीन व खाणे हा त्याचा प्रांत होता. अगोदर भराभर ऑर्डर्स देवून झाल्यावर व सुरुवातीच्या एकदोन डिश हादडल्यावर, पाणी प्यायल्यावर तो शांतपणे मलाच म्हणाला की एकंदरीत झाल्या प्रकरणात जरी फक्त माझीच चूक असली तरी मोठ्या मनानी त्यानी मला माफ केले होते. यावर

मी काही बोलणार तोच फ्रेनीने माझा हात दाबला व नजरेनेच काही बोलू नको असे सुचविले. इकडे रोनीची वाक्गंगा चालूच होती.

थोडक्यात सांगायचे झाले तर यापुढे तो सांगेल तसे मला वागायचे होते. त्यानुसार सर्वप्रथम मला सकाळचे पेपर वाटप बंद करायचे होते. ते बंद करून मी खावू काय या प्रश्नावर सुटीच्या दिवशी त्याच्या जिमचे अकाऊंटचे काम मी करावे हे त्यानेच ठरवले होते. तसेच त्यांचे अभ्यासातले प्रॉब्लेम मी रोज फ्रेनीकडे संध्याकाळी एक तास बसून सोडवायचे होते. मी नम्रपणे त्याला अंतराची जाणीव करून देताच फ्रेनीला तिच्याकडे एक सायकल पडून असल्याचे आठवले. अर्थात् मला ती वापरणे भाग होते. चर्चचे काम करून मी हे सर्व सहज करेन अशी त्या दोघांनी मला खात्री दिली. मला मदत करण्यासाठी ते ही न दुखवता, त्यांची चाललेली धडपड बघून मला त्यांना नाही म्हणवेना.

“हे आता फायनल” रॉनिने टेबलावर हात आपटून जाहीर केले ”अजून महत्वाचे म्हणजे तुझा पूर्ण पत्ता खाणाखुणा सकट फ्रेनीला लिहून दे “.

मी निमुटपणे तिच्या वहीत पत्ता लिहून दिल्यावर रॉनीकडे बघितले तर तो गायब झाला होता. अरे हा कुठे गेला असे फ्रेनीला विचारत असतां काही मुलींचा घोळका आमच्या टेबलपाशी रेंगाळला. त्यातल्याच एकीने रॉनी कुठे गेला असे फ्रेनीला विचारले. त्याला महत्वाचे काम आठवले म्हणून तो ताबडतोब गेला असे फ्रेनीने सांगितले.

तोच तिचे लक्ष माझ्याकडे गेले. ओहो, स्कॉलर आज आपण कॅन्टीन मध्ये कसे काय? असे किंचित उपरोधाने विचारले आणि लगेच अभिनंदन म्हणत हात पुढे केला. अभावितपणे मी पण हात पुढे करताच तिचे लक्ष माझ्या बाहीवरच्या रक्ताच्या डागांवर गेले. गडबडीने हात मागे घेत तिने हे डाग कसले असे विचारले. मी काही बोलणार तोच त्याला कसलीतरी ॲलर्जी आहे त्याचे ते डाग आहे असे फ्रेनी सांगून मोकळी झाली. हे सांसर्गिक असते काय या तिच्या शंकेवर असेल कदाचित असे फ्रेनीने लांब चेहरा करून सांगितले. हे ऐकताच ती अंतर्धान पावली.

तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बघत नटवी मेली अशी फ्रेनीने प्रतिक्रिया दिली. दिवसभरच्या घडामोडीनंतर पण मला अक्कल आली नव्हती. याचा पुरावा मी ही कोण व तू तिच्याशी अशी का वागली असे विचारून मी सिध्द केले.

“ती प्रिया ठाकूर, रॉनी फक्त तिलाच घाबरतो. अजून काही?”

“काही नाही”

माझे शंकासमाधान झाले होते.

“तर मग आता आपण माझ्या घरी जावू ”

आता काही विचारण्यात अर्थ नव्हता म्हणून मी मुकाट्याने तिच्याबरोबर निघालो.

तिच्या घरी गेल्यावर सर्वप्रथम तिने माझे हात स्वच्छ धुवून जखमांवर डेटॉल लावले. नको नको म्हणत असता तिच्या वडिलांचा टी शर्ट मला घालायला लावला

व हात बरा होईपर्यंत हाफ शर्ट घालायला बजावले तसेच सायकल पण ताब्यात दिली. आतापर्यंतच्या अनुभवाने काही न बोलण्याचा मार्ग मी पत्करला आणि रात्री आठला घरी पोचलो.

हा प्रसंग सोडल्यास त्यानंतर आमच्यात कधीही भांडण झाले नाही.

---

<u>नोकरी</u>

नंतरची दोन वर्षे मला कामाच्या दृष्टीने जरा आरामाची गेली असे म्हणता येईल. रॉनी आणि फ्रेनीने माझे श्रम जास्तीत कमी करण्यासाठी खूपच प्रयत्न केले यात शंकाच नाही. दोघांनी घरी पण येणे सुरू केले. रॉनीने आईची मर्जी संपादन करून वेगवेगळे पदार्थ हाणायला सुरुवात केलीच होती. पण काहीतरी कारण सांगून हळूच महिन्याचा किराणा भरायची सुचकता दाखवीत होता. एकदा तर मला फ्रेनी चक्क स्टोशी झटापट करतांना दिसली. तिला या कशाची सवय नाही, या गोष्टी तिला कशाला करू देतेस असे मी आईला म्हणताच मलाच चहा करायला शिकायचे आहे असा तिने हट्ट धरल्याने माझा नाइलाज झाला असे आई ओशाळून म्हणाली.

असेच दिवस भराभर सरले आणि बघता बघता आम्ही पदवीधारक झालो व आमचे मार्ग भिन्न झाले. रॉनी इंग्लंडला गेला आणि तिकडेच स्थाईक झाला, फ्रेनी एम बी ए करू लागली व मी नोकरी.

सेवा बँक तेव्हा नवीनच सुरू झाली होती. चाळीतल्या जोशीकाकांची संचालक मंडळात ओळख होती. त्यांच्या शिफारशीने अनुभव नसतानाही माझे काम झाले. नोकरी करतांना मी पार्ट टाईम कॉलेज करून पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. त्याच दरम्यान बँकेत मॅनेजमेंट ट्रेनी करिता जाहिरात प्रसिद्ध झाली. एव्हाना

माझा अनुभव पण पुरेसा होता म्हणून मी अर्ज केला व दोन वर्षांच्या प्रशिक्षणासाठी माझी निवड झाली.

या सर्व बदलांमध्ये मी चाळ सोडून एक लहानसा ब्लॉक घेतला. चाळ सोडतांना वाईट जरूर वाटले पण इलाज नव्हता. मॅनेजर म्हणून माझे पोस्टिंग जुन्याच शाखेत झाले. परत जुन्या सहकाऱ्याबरोबर काम करायला मिळणार या कल्पनेने मला आनंद झाला.

पण माझा लवकरच भ्रमनिरास झाला. सहकाऱ्याबरोबर एक सहकारी म्हणून काम करणे वेगळे आणि त्यांचा वरिष्ठ म्हणून काम करणे अजून वेगळे हे मला लवकरच उमजून आले. त्यातच भर म्हणजे शिक्षण आणि विशेष प्रशिक्षण असल्याने मला ज्येष्ठताक्रम डावलून बढती मिळाल्याने काही जुनी मंडळी नाराज झाली होती. अर्थात् खाजगी संस्थांमध्ये या गोष्टी गृहीत असतात तरीपण माणसे दुखावली जातात हे खरे आहे.

अशाच नाराज मंडळींपैकी एक श्रीयुत शर्मा होते. ते उघडपणे काही दर्शवित नव्हते पण लहानसहान कृती अशा करायचे की कोणालाही त्यांची नाराजी सहज लक्षात यायची. तशी त्यांची नोकरीची पाच वर्षे बाकी होती पण माझ्यामुळे एक संधी दुरावल्याचे त्यांना वाटत होते. कामात ते उत्तम होतेच आणि विशेष रुची शेअर्स मध्ये होती. मी तर असेही ऐकून होतो की संचालक मंडळात पण दोघातिघांच्या ते विशेष मर्जीतील होते. असू दे त्यात काय विशेष आपण आपल्या

कामात चोख असले की झाले आणि काही महिन्यात त्यांचा राग कमी होईल असा विचार करून मी गप्प राहिलो. तीच माझी सर्वात मोठी चूक ठरली.

सर्व काही ठीक चालले आहे असे वाटत असता एक दिवस मी बँकेत जाताच मला भेटण्यासाठी एक पोलिस इन्स्पेक्टर आल्याचे शिपायाने सांगितले. ठीक आहे, त्यांना आत पाठव असे मी सांगताच मागोमाग आमच्या चाळीतील अवी आत आला. तो इन्स्पेक्टर आहे हे मला आधी जरी ठावूक होते तरी ड्रेसमुळे त्याला ओळखायला मला जरा वेळ लागला.

"अरे अव्या, काय अगदी अचानक "मी विचारले.

दिलखुलासपणे हसून त्याने हात मिळवला. हे सर्व कुतूहलाने बघणाऱ्या शिपायाला मी चहा आणण्यास पिटाळले व किंचित शरमेने त्याला म्हणालो "अरे मावशीचे मला कळले पण माफ कर मी तेव्हा इथे नव्हतो".

"अरे काही वाटून घेवू नकोस. मला तुझी अडचण समजू शकते. तशी ती बरीच आजारीपण होती एक प्रकारे तिची सुटकाच झाली" किंचित खेदाने अवी म्हणाला.

तेवढ्यात चहा आला आणि अजून काय बोलावे या प्रश्नातून माझी तात्पुरती सुटका झाली.

चहा पिणे झाल्यावर अवि म्हणाला "माझे एक छोटेसे काम आहे".

"बोल ना".

“तुला तर कल्पना असेलच की आईचे तुझ्या बँकेत बचत खाते आहे पण ते बरीच वर्षे झाली नुसतेच पडून आहे”.

“हो, तुझी नोकरी सुरू झाल्यावर मावशीने अधूनमधून लागले तर असावे म्हणून चालू ठेवले एवढेच”.

“बरोबर, परवा जुनी कागदपत्रे बघतांना मला तिचे पासबुक सापडले. मी विचार करतोय की हे खाते आता बंद करावे व जे काही पैसे येतील ते तिच्या नावाने एखाद्या सामाजिक संस्थेला द्यावे”.

“चांगला विचार आहे” मी पासबुक हाती घेत म्हणालो “पण मला जरा सर्व रेकॉर्ड चेक करायला दोन - तीन दिवस लागतील, चालेल ना?”

तो काही बोलायच्या आत शर्मा आत आले. आम्हा दोघांना बोलतांना बघून सॉरी म्हणत परत जावू लागले तसे मी त्यांना थांबवले व ’शर्माजी मी आता तुम्हाला बोलवणारच होतो” असे म्हणालो. त्यावर ते जरा चपापून ’का बरे” असे म्हणाले.

मी अवीची व त्यांची ओळख करून दिली आणि अविचे काम त्यांना सांगितले कारण बंद आणि बुडीत खाती ते बघायचे. त्यांनी पासबुक नीट तपासले व चेहरा आंबट करीत म्हणाले ” मी जरूर बघतो पण पासबुक नवीन करावे लागेल आणि सर्व ऐंट्रिज येतीलच याची खात्री वाटत नाही कारण कॉम्प्युटरायझेशन च्या आधीच्या ऐंट्री आहेत”.

“अहो ज्या येतील त्या येतील” मी काही बोलायच्या आत अवी म्हणाला “तुम्ही जे द्याल ते आम्हाला मान्य “असेही वर गमतीने म्हणाला.

“नाही साहेब, बरीच जण नंतर तक्रार करतात “किंचित वरमुन शर्मा म्हणाले “मी शुक्रवारी सर्व तयार ठेवतो ”.

चालेल, चालेल असे म्हणत अवी निघून गेला मागोमाग शर्मा पण गेले नंतर माझे लक्ष सहज बाहेर गेले तर मला शर्मा शिपायाशी काही बोलतांना दिसले. मी त्याकडे काही विशेष लक्ष दिले नाही. दुसऱ्या दिवशी मी काही न सांगताच शर्मांनी मला मावशींचे नवीन पासबुक व बरोबर क्लोझर फॉर्म माझ्या सुपुर्द केला. मी त्यांना बसायला सांगितले व सहज पासबुक चालू लागलो.

“शर्माजी याची इतकी काय घाई नव्हती, आपल्याला हे शुक्रवारी द्यायचे आहे”.

“ आज जरा मोकळा वेळ मिळाला म्हणून करून टाकले शिवाय तुझ्या मित्राचे काम”.

शर्माजी जरा बसक्या आवाजात म्हणाले.

मी चमकून त्यांच्याकडे बघितले तर ते घाम टिपत होते.

“काय झाले शर्माजी, तुमची तब्येत तर ठीक आहे ना?

“माझी ठीक आहे पण घरी मिसेस आजारी आहे पण ईथे इयर ऐंडींग असल्यामुळे येणे जरुरी होते”.

“अहो काहीतरीच काय, तुम्ही ताबडतोब घरी जा पाहू. मी बघतो तुमचे काम”.

“असे म्हणतोस? तर मग ठीक आहे पण काही गरज पडल्यास मला नक्की कळव “असे म्हणून त्यांनी मला किल्ल्या दिल्या व ते गेले.

ते गेल्यावर मी सहज पासबुक चाळले तर त्यात मला शेवटची जमा रक्कम पंचवीस हजार आढळली. ती वाचून मला जरा धक्काच बसला कारण मावशी खूप काटकसरी होत्या हे जरी मला माहिती होते तरी अवीच्या नोकरीआधी एवढी मोठी रक्कम (त्या काळातली) त्या नुसत्याच जमा करतील हे आणि अजिबात वापरणार नाही हे शक्य नव्हते. अविलाच विचारू असा विचार करून मी पासबुक ड्रॉवरमधे ठेवले व कामाला लागलो.

वर्षअखेर असल्याने कामाचा व्याप खरंच इतका प्रचंड होता की अवि आला त्यावेळी मी त्याला काहीच विचारू शकलो नाही. शर्मांचे काम तात्पुरते करण्यासाठी मी एक नवीन उमेदवार मागून घेतला कारण पूर्ण वेळ ते काम बघणे मला शक्य नव्हते. मला माणूस पण चांगला मिळाला. शाम त्याचे नाव. त्याने झपाट्याने काम समजून घेतले व माझी एक काळजी दूर झाली. शर्मा कर्ज व ठेवी पण बघायचे त्यामुळे तो नेहमी ग्राहकांच्या गराड्यात असायचा. अगदीच काही अडले तर मी होतोच.

दुसऱ्याच आठवड्यात शाम अजून एका ग्राहकाला बरोबर घेऊन आला.

“सर, यांची तक्रार आहे”.

मी दोघांनाही बसायला सांगितले विचारले “कसली?”

“मिसेसचे खाते बंद करायचे आहे पण हे म्हणतात ते आधीच बंद झालेले आहे”.

“काय रे शाम? हा काय प्रकार आहे?”.

“सर, तसा रेकॉर्ड आहे “शाम नोंदी दाखवीत म्हणाला.

मी बघितले तर नोंदी बरोबर होत्या. मी ग्राहकाला त्या दाखविताच तो पण बुचकळ्यात पडला.

“पण मला सांगितल्याशिवाय ती कधीच काही करत नाही”.

तेवढ्यात अवि आत आला आणि आम्ही बोलत आहोत असे बघून परत जाऊ लागला. तोच धागा पकडून मी त्याला आवाज देवून बोलावले. ग्राहकाला वाटले की आम्हीच पोलिसांना बोलावले म्हणून तो जरा चपापून म्हणाला, ” काय साहेब हे, मी कुठे काय तक्रार केली आहे काय, लगेच पोलीस कशासाठी बोलावले?”

किंचित हसून मी म्हणालो, “त्यांची केस तुमच्यापेक्षा उलट आहे म्हणून”

“म्हणजे?”

“अहो, त्यांच्या आईचे पंचविस हजार बँकेत जमा होते हे त्यांना माहिती पण नव्हते”

“खरं की काय?”

” अगदी खरे आहे “अवि म्हणाला “शेवटी या साहेबांनी मदत केली म्हणून मिळाले”.

“आता तुम्हीच बघा, आपल्याच घरातील व्यक्ती आपल्या नकळत कधी कधी व्यवहार करतात आणि आपल्याला काहीच कल्पना नसते”

“ते असे का करत असतील?”

“ कधी आपल्याला आश्चर्याचा धक्का देण्यासाठी तर कधी आपण हे करू शकतो की नाही हे बघण्यासाठी “मी शांतपणे उत्तरलो.

तेवढ्याने त्याचे समाधान झाले असावे कारण तो लगेच उठला व घरीच विचारतो असे म्हणत गेला.

तो गेल्यावर मी अवीला अचानक येण्याचे कारण विचारता तो म्हणाला की विशेष काही नाही, मागील वेळी घाईत असल्याने काही बोलणे झाले नव्हते, तसेच पैसे अनाथाश्रमाला दिले हे पण सांगायचे होते म्हणून.

ते ऐकून मी समाधान व्यक्त केले पण एवढे पैसे जमा असल्याचे त्याला माहिती कसे नव्हते हे विचारलेच.

“ खरेतर मलापण नवल वाटते, पण जुनी माणसे काही वेळा जरा विचित्रच वागायची” असे तो म्हणाला व परत एकदा निवांत भेटू असे म्हणून गेला. तो गेल्यावरही शाम थांबला म्हणून मी प्रश्नार्थक मुद्रेने बघताच तो म्हणाला

“अजून एक प्रॉब्लेम आहे”.

“कसला?”

“ बरडीयाचा माणूस लोनसाठी पत्र घेवून आला आहे “

बरडीया बँकेच्या संचालक मंडळावर होते. शहरात त्यांचा कापडाचा मोठा व्यवसाय होता. संचालक मंडळातील सर्वच सदस्य कर्ज घ्यायचे तसेच हे ही असेल असे मला वाटले.

“मग?”

“आधीचे लोन पेमेंट अजून झाले नाही सर”

“असे कसे होईल आणि त्यांच्या बाबतीत तर आपण नवीन लोन देवू शकतो त्यातून आधीचे लोन कट करू शकतो”

“हे आधी दोन वेळा झाले आहे आणि दर वेळी आपण हे करणे बरोबर होणार नाही असे मला वाटते”.

“तुझ्या म्हणण्यात तथ्य आहे. तू तो अर्ज तर घेवून ठेव मी देवसाहेबांशी बोलतो” मी एवढे म्हणेपर्यंत त्यांचा माणूस आलाच.

“साहेब, मी शेठना काय सांगू “तो म्हणाला.

“सध्या वर्ष अखेरची कामे चालू आहेत. आठ दहा दिवस वेळ लागेल असे सांगा “.

ठीक आहे असे म्हणत तो निघून गेला व मी शामला सर्व रेकॉर्ड तयार करण्यास सांगितले पण तो सर्व तयारीनिशी आला होता. त्याने पटकन एक फाईल मला दिली. त्यात सर्व संचालकांची नावे व त्यांच्या लोनची माहिती दिली होती. आकडे व थकबाकी बघून मला नवल वाटले. सर्व संचालक व त्यांचे नातेवाईक

यांनी मिळून तीस कोटी उचलले होते आणि एकही हप्ता भरला नव्हता. बँकेकडे शंभर कोटींच्या ठेवी होत्या आणि बँकेने नव्वद कोटी कर्जाऊ दिले होते. साधारणपणे ठेवी आणि कर्ज यांचे गुणोत्तर ऐंशी ते नव्वद टक्के असल्यास बँकेची तरलता (Liquidity) उत्तम मानल्या जाते पण ते कर्जवसुली योग्य प्रकारे होत असल्यास. येथे तर तीस टक्के कर्ज परत यायची शक्यताच दिसत नव्हती आणि त्यादृष्टीने काही प्रयत्न पण होतांना दिसत नव्हते. तशी माझी व्यवस्थापनातील श्रेणी यावर काही अधिकाराने कृती करता येईल अशी नव्हती पण निदान आपले वरिष्ठ या बाबतीत काही करत आहेत काय हे जाणून घेण्यासाठी शाम आणि मी माझे वरिष्ठ साने यांच्याकडे गेलो. आम्ही गेलो तेव्हा ते टेबल आवरित होते आम्हाला बघताच हसून म्हणाले "फक्त पाच मिनिटात आवरा, आज मला वेळेवर घरी जायचे आहे"

ठीक आहे असे म्हणून मी हातातील अर्ज व आमच्या शंका त्यांना सांगितल्या. खुर्चीत किंचित मागे रेलून बसत त्यांनी सर्व ऐकून घेतले नंतर हळूच म्हणाले "याशिवाय अजून काही?"

"नाही"

"मग निर्धास्त रहा, पुढील वर्षी दोनशे कोटी ठेवीचे टार्गेट आहे".

"सर याच शंभर कोटी ठेवी जमा करायला आपल्याला चार वर्षे लागली "

" तेव्हा बँकेची सुरवात होती. आता नाव झाले आहे त्यामुळे वेळ कमी लागेल. झाले, आता जा पाहू आणि मलापण जाऊ द्या".

त्यांनी अर्जावर मंजूर असा शेरा मारला व अर्ज माझ्या हातात देत परवाच्या संचालक मंडळाच्या मिटिंग मध्ये प्रमुख संचालकांची सही घेण्यासाठी सांगितले”.

“तुम्ही नाही का येणार” मी विचारले.

“अरे मी जरा उशिरा येणार आहे म्हणून तूच बघ”.

झाले विषयच संपला. थकलेली येणी कशी वसूल करणार हा प्रश्न अनुत्तरितच राहिला.

“आता पुढे काय करायचे सर ”शामने बाहेर येताच विचारले.

“आता प्रमुख संचालक देव यांना भेटणे, तुलापण बरोबर यायचे असल्यास तू येवू शकतो”

“ का नाही? मला पण त्यांना भेटायला आवडेल पण एक विचारू काय?”

“जरूर”

“तुम्ही हे सर्व का करताय? ही काही तुमच्या एकट्याचीच जबाबदारी नाही. तुमच्या वरिष्ठांना तुम्ही जाणीव केली एवढे पुरेसे आहे”.

क्षणभर मी थबकलो. खरंच की मला तशी काय गरज होती हे सर्व करण्याची, पण फक्त क्षणभरच, नंतर माझ्या डोळ्यासमोर आले ते छोटे छोटे ठेवीदार, जे वेळोवेळी मला भेटायचे व विश्वासाने आपली पुंजी जमा करायचे. मी आत्ता गप्प बसलो तर त्यांच्याशी प्रतारणा केल्यासारखे होणार नाही काय?

पण उघडपणे हे न बोलता हे कोणीतरी करायलाच हवे म्हणून एवढेच म्हणालो.

दोनच दिवसांनी आम्ही दोघेही देव साहेबांच्या बंगल्यावर गेलो. तेथे गेल्यावर कळले की त्याची तब्येत ठीक नाही तरीपण ते अगत्यानी आम्हाला भेटले. बँकेबाबत सर्व माहिती घेतली. आमचे शंका समाधान केले व संचालक बैठकीत जरुर हा विषय घेऊ असे म्हणाले आणि हो बरडीयांचा अर्ज व शामची फाईल त्यांनी ठेवून घेतली. मला जरा काळजीपूर्वक वाचली पाहिजे असे म्हणत त्यानी शामचे कौतुक केले.

परत येतेवेळी शाम फार खुशीत होता.

"खरंच फार थोर माणूस आणि किती साधे"

"खरेच आहे ते" मी शांतपणे म्हणालो "त्यांनी बँक उभी केली आहे त्यांना काळजी असणारच".

वर वर जरी मी असे म्हणालो तरी काही होईल असे मला खात्रीपूर्वक वाटत नव्हते कारण सुरवातीचे काही संचालक बदलून आता त्यांची दुसरी पिढी आली होती आणि ती देव साहेबांचे कितपत ऐकेल याची मला शंका होती. सोमवार सकाळपर्यंत तरी देव साहेबांकडून काही निरोप आला नाही. साने साहेब मात्र उशिरा येणार होते ते आधीच आले. आल्याबरोबर त्यांनी मला बोलावले व बरडीया यांच्या अर्जाचे विचारले. अजून काही झाले नाही कळताच जरा नाराज झाले पण आपण दोघेही मीटिंगला जावू असे म्हणाले आम्ही जेव्हा पोचलो तेंव्हा एक दोघे

संचालक व कामगार प्रतिनिधी एवढेच आले होते. हळूहळू सर्व आले व सर्वात शेवटी देव साहेब आले. ते येताच आम्ही सर्वांनी_उठून त्यांना अभिवादन केले. औपचारिक बोलणे व नैमित्तिक कामे होताच बरडीयाने कर्जाचे विचारले.

“मी तोच विषय आता घेणार आहे “देव साहेब म्हणाले. त्यांनी सविस्तर माहिती सर्व संचालकांना दिली आणि अशा परिस्थितीमुळे कर्ज देणे योग्य होणार नाही हे विशद केले.

“हे माझ्या विरुद्ध केलेले कारस्थान आहे” बरडीया ओरडून म्हणाले “आतापर्यंत सर्वांना विनातक्रार री-लोन देण्यात आले आहे. फक्त माझ्याच बाबतीत हा भेदभाव का?”

त्यावर देव साहेबांनी त्यांना परिस्थिती समजून सांगण्याचा प्रयत्न केला पण ते ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हते. या नरेनने तुमचे कान फुंकले हा पण आरोप त्यांनी केला. पंधरा- वीस मिनिटे हे दोषारोप चालू असतांना माझे वरिष्ठ एक शब्दही बोलले नाहीत. शेवटी एक ज्येष्ठ संचालक सोराबजी याच्या सुचने वरून मतदान घेण्यात आले आणि बहुमताने कर्ज मंजूर झाले. तेव्हाच माझ्या मनात धोक्याची घंटा वाजू लागली. बाहेर येताच बरडीया मला मुद्दाम थांबवून म्हणाले की पाण्यात राहून मगरीशी वैर करणे चांगले नसते. यावर मी अर्थात् कसलीच प्रतिक्रिया दिली नाही. त्या दिवसापासून मला दिवसेंनदिवस काम करणे कठीण होऊ लागले.

## आरोप

इअर एंडींग पार पडले. प्रथेप्रमाणे ऑडीटर्सनी त्यांचा रिपोर्ट प्रमुख संचालक यांच्याकडे सादर केला. तासाभरातच मला देव साहेबांनी बोलावले. प्रमुख ऑडिटर तेथे बसले होते. हे बघून माझ्या मनात शंकेची पाल चुकचुकली. वातावरणातील तणाव जाणवत होता. बहूतेक बुडीत कर्जाबाबत आक्षेप घेतला असेल असे मला वाटले. मला बसण्यास सांगून देव साहेबांनी ऑडिटरला बोलावयास सांगितले. किंचित घसा खाकरून त्यांनी सुरुवात केली.

“मी प्रमुख गोष्टी थोडक्यात सांगतो. डिटेल रिपोर्ट आठवड्यात येईलच. बुडीत कर्जे व त्यांची वसुली या जरी चिंताजनक बाबी असल्या तरी अजून एक बाब आमच्या निदर्शनास आली आहे. त्यावर मी आता काम करीत आहे ती म्हणजे जुनी बंद पडलेली किंवा करण्यात आलेली खाती. आमच्या असे निदर्शनास आले आहे की यापैकी बरीचशी खाती खातेदारांच्या नकळत किंवा त्यांना फसवून बंद करण्यात आली आहे”.

“म्हणजे नक्की काय झाले आहे ” बरडीया

“फार हुशारीने हे काम करण्यात आले आहे. एक तर बंद झालेल्या खात्यांची कोणी चौकशी करत नाही आणि कोणी केलीच तर तेवढ्यापुरते त्याला गप्प करता येते”.

“तुमच्या अंदाजाने किती रकमेचा अपहार झाला असावा “इती देव.

“एक मिनिट, याला अपहार म्हणायचे की नाही हे आताच स्पष्ट करता येणार नाही. पण पुरेशी काळजी न घेतल्याने सरकार व ग्राहकांचे पंधरा लाख तरी बुडाले. कागदोपत्री व्यवहार चोख असल्याने कोणाला जबाबदार ठरवावे हे बँकेनी ठरवावे. रिझर्व्ह बँक यावर कठोर कारवाई करण्यास सांगेल आणि पैसे जमा करण्यास लावेल हे नक्की”.

“यावर काही मार्ग?”

“रीतसर पैसे भरणे “एवढे बोलून ते गेले.

त्यानंतर दोन मिनिटे शांततेत गेली. नंतर देवांनी माझ्याकडे सहेतुक बघितले व मला स्पष्टच विचारले “हे तुला माहिती होते?“

“किंचित जाणीव होती पण खात्री नव्हती” मी शांतपणे म्हणालो “मी याबाबत तुमच्याशी बोलणारच होतो”.

“ यावर विश्वास ठेवणे मला तरी शक्य नाही” किंचित थांबून ते म्हणाले “केवळ असे म्हणून तू तुझी जबाबदारी टाळू शकत नाही ”

आता मला बरडीयांच्या उपस्थितीचे कारण कळाले. मी स्पष्टच म्हणालो “झालेल्या प्रकाराला मी जबाबदार नाही. मी कसलीही अफरातफर केलेली नाही”.

“मी पण तसे म्हणत नाही पण अंतिम जबाबदारी तुझीच आहे ”.

“हे मी नाकारित नाही”.

माझ्याकडे स्थिर दृष्टीने बघत ते म्हणाले "जर हे प्रकरण बँकेने पोलिसांकडे सोपवले तर बँकेवर पण विपरीत परिणाम होऊ शकतो आणि तुझी करियर तर पूर्णच उध्वस्त होईल हे नक्कीच". एव्हाना देव साहेब काय म्हणू इच्छित आहे हे माझ्या पूर्ण लक्षात आले होते तरीपण तुम्हाला नक्की काय म्हणायचे आहे हे मी विचारले.

" एक तर तू पंधरा लाख आठवड्यात जमा करावे अन्यथा बँक पोलिसांकडे प्रकरण सोपवेल" ते स्पष्टच बोलले".

क्षणाचाही विलंब न लावता मी उत्तर दिले "मी पूर्णपणे निर्दोष आहे आणि हे मी सिद्ध करेनच. बँकेने जी कारवाई करायची ती करावी".

"बघ, अजूनही विचार कर, अजून लहान आहेस. पूर्ण आयुष्य बाकी आहे".

" धन्यवाद, माझा न्यायसंस्थेवर विश्वास आहे ".

त्यावर ते किंचित हसून म्हणाले "अजून बरंच जग तुला बघायचं आहे".

मी बाहेर येताच सर्वप्रथम मला भेटलेली व्यक्ती म्हणजे बरडीया. मला बघताच ते कसलीही प्रस्तावना न करता नरेन अजूनही सावध हो तुला कल्पना नाही तू कोणाशी टक्कर घेत आहे एवढेच म्हणाले व गडबडीने निघून गेले.

कोणत्याही परिस्थितीत पंधरा लाख भरणे मला शक्य नव्हते आणि मी निर्दोष असल्याचे सहज सिद्ध होईल अशी मला खात्री होती. त्यानंतर चक्रे अशी जोरात फिरू लागली की क्षणोक्षणी मला देववाक्यं आठवू लागली. बरोबर एका

आठवड्यानंतर मला रीतसर शो-कॉज नोटीस बजावण्यात आली. माझे उत्तर फेटाळण्यात आले आणि पोलिसांकडे प्रकरण वर्ग करण्यात आले. या सर्व घडामोडी होत असतांना बँकेत खळबळ उडणे स्वाभाविक होते. शर्मा आता रजा संपवून परत रुजू होणार होते. ते अगोदर मला भेटायला घरी आले.

'नरेन हे मी काय ऐकतोय?" त्यांनी विचारले. मी थोडक्यात सर्व माहिती सांगितली त्यावर ते थोडा विचार करून म्हणाले की तुला पद्धशीरपणे अडकवण्यात आले आहे आणि यातून सुटण्यासाठी सरळ पंधरा लाख भरणे हाच एक सोपा मार्ग आहे. यावर मी असमर्थता व्यक्त करताच त्यांनी शक्य तेवढी रक्कम त्यांच्या पी एफ मधून देण्याची तयारी दाखवली. यावर काय बोलावे हे मला सुचेना. शेवटी नाराज होवून ते गेले.

घरच्या आघाडीवर मात्र माझा सपशेल पराभव झाला. बँक पोलीस केस करणार हे करताच आईने माझ्याशी बोलणे टाकले ते कायमचेच. मी जीव तोडून माझे म्हणणे मांडले पण ती काही एक ऐकून घ्यायला तयार नव्हती. शेवटी एक दिवस मामा आला व तिला घेवून गेला. त्यानी निदान माझे बोलणे तरी ऐकून घेतले. फक्त फ्रेनी मात्र ठामपणे माझ्या बाजूने उभी राहिली.

यानंतर मात्र पोलीस व न्याय यंत्रणा ज्या अफाट गतीने काम करू लागल्या ते बघताच या गतीमागे नक्कीच कोणीतरी करविता आहे याची मला खात्री वाटू लागली. बँकेच्या व्यवहारावर विपरित परिणाम होऊ नये म्हणून खटला in-camera चालविण्यात आला. ज्या तडफेने पुरावे व साक्षीदार सादर करण्यात

आले ते बघता मला अजिबात बचावाची संधी न देण्याचा जणू कोणीतरी चांग बांधला आहे हे जाणवत होते. सरकारी यंत्रणा अशी कार्यक्षमता नेहमी दाखवतील तर बरेच गुन्हे होणारच नाही असे मला बरेचदा वाटले. माझ्या वकिलाचा सुरवातीचा उत्साह हळूहळू कमी झाला. नंतर तर तेच मला गुन्हा कबुल करून टाक, आपण कमीत कमी शिक्षा होईल हे बघू असे म्हणायला लागले जे मी अर्थातच नाकारले. मला तोपर्यंत तरी न्याय मिळेल अशी खात्री होते पण जसा जसा सुनावणीने वेग पकडला तशी माझी आशा निराशेत बदलू लागली. शेवटी तर काय एकदाचा निर्णय द्यायचा तो द्या आणि हे प्रकरण संपवावे असे मला वाटू लागले. देवसाहेब मला बच्चा आहेस असे का म्हणत होते ते आता मला. समजू लागले. एक वर्षापूर्वी मी काही स्वप्ने बघितली होती ती तर केंव्हाच जळून खाक झाली होती. आता मी फक्त एक आरोपी म्हणून सात वर्षे वावरणार होतो.

तेवढ्यात गचकन ब्रेक मारून व्हॅन थांबली व चला खाली उतरा असे शिपाई मोठ्याने म्हणाला व माझी तंद्री भंगली.

---

जेल

खाली उतल्यानंतर मध्यवर्ती कारागृह विसापूर अशी मोठी अक्षरे मिरवणारी एक भव्य इमारत दिसली. मुख्य प्रवेशद्वारातून आम्ही आत गेलो. थोड्याच अंतरावर तुरुंगाधिकारी अशी पाटी असलेल्या एका केबिन मध्ये आम्ही प्रवेश केला. तेथील अधिकाऱ्यांना अर्थात् आधीच कल्पना असल्याने सर्व कागदपत्रे तयार होती. सगळे सोपस्कार आटोपताच माझी रवानगी कोठडी नंबर आठ मध्ये करण्यात आली. मला कोठडी दाखवून सात वाजता जेवणाची घंटा होईल असे सांगून तो निघून गेला.

माझ्या आधीच कोठडीत चौघेजण असल्याने माझी भर त्यांना नकोशी वाटणे साहजिक होते. आधीच कोर्टाच्या निकालाने माझे डोके भणभणत होते त्यामुळे मला कोणाशीही बोलण्याची इच्छा नव्हती. तेवढ्यात जेवणाची घंटा वाजली. मी स्वतःहूनच मेसकडे निघालो. कारागृहाची रचना तशी साधी होती. एका चौरसाच्या तीन बाजूला कोठड्या, चौथ्या बाजूला ऑफिस आणि मेस. या सर्वाभोवती साधारण दोनशे फूट समांतर अंतरावर वीस फूट संरक्षक भिंत, चारही दिशेला चार मनोरे ज्यावर बंदूकधारी शिपाई पहारा देत होते. पहिल्याच दृष्टीक्षेपात न आवडणारेच दृश्य होते हे नक्की.

हा विचार करत असताच मी मेस मध्ये पोचलो. तेथे आधीच पंचवीस-तीस जण रांगेत उभे होते. दोन टेबलांवर चार मोठ्या भांड्यातून चार कैदी जेवण देत

होते. मी पण थाळी कटोरा घेतला व रांगेत उभा राहिलो. रांग भराभर सरकत होती कारण दोन चपाती, डाळ व एक वाटी भात एवढेच सर्वांना देत होते. मी पण जेवण एका रिकाम्या जागी बसू लागताच एकजण मागून माझी जागा आहे दुसरीकडे बस असे दरडावून म्हणाला. अशी जागा वगैरे काही कोणाची नसते इतपत समज मला होती पण उगीच कटकट नको म्हणून मी दुसरीकडे बसायला गेलो तर तिथे पण एकानी तसाच आवाज दिला. तेंव्हा मात्र हे सर्व मुद्दाम केले जात आहे हे मला जाणवले म्हणून मी जेवण सुरू करत भरपूर जागा आहे, दुसरीकडे कुठेही बसा असे सुनावले. मी असे काही उलट बोलेन अशी त्याची अपेक्षा नव्हती. त्यामुळे तो काही बोलणार तेवढ्यात दुरून लक्ष ठेवणारा शिपाई ए काय चालले आहे तिथे असे मोठ्यांनी ओरडला. त्याबरोबर तो रागाने काहीतरी बडबडत दुसरीकडे बसायला गेला.

"भाऊ, कशापाई ही वादावादी, जरा दमानी घ्यावं" माझ्या शेजारी बसत एकजण म्हणाला.

अजून एक उपदेशक. मी मनाशी म्हणालो. पण त्याच्याकडे बघताच काही उलटुन बोलावे असे मात्र मला वाटले नाही कारण त्याचा विलक्षण शांत चेहरा. मला एकदम फादर फ्रान्सिस समजावत आहे असा भास झाला. पण वरकरणी काही न बोलता मी जेवण सुरूच ठेवले. तुरुंगात पण टोळ्या असतात, तुम्हाला कोणत्यातरी एका टोळीत सहभागी व्हावे लागतेच अन्यथा टिकून राहणे कठीण असते हे मी ऐकून होतो पण इतक्या लवकर याची सुरवात होईल असे वाटले नव्हते. जेवण संपताच माझ्याबरोबर माझा उपदेशक पण उठला. बहुतेक तो

माझ्यासाठीच थांबला होता. सुरवातीला असेच होते, सर्वजण आपल्या विरोधात कट करीत आहेत, मारायला टपले आहेत अशी भावना होते. फार असुरक्षित वाटते व त्यातूनच चुका होतात असा उपदेशाचा सूर होता. हा एवढा संतकोटीचा माणूस इथे कसा हा मी मनाशीच विचार करत होतो. तेवढ्यात बाबा बोललेच.

"डोके भणभणत असेल, चल माझ्याबरोबर जरा दोन चकरा मार".

मला शांत करण्याचा तो आटोकाट प्रयत्न करीत होता हे मला जाणवत होते. त्याच्या बोलण्यात इतके आर्जव होते की मला नाही म्हणवेना.

"आता नवू वाजता घंटा होईल तोपर्यंत मोकळा वेळ असतो "त्याने माहिती पुरवली.

"ठीक आहे "असे म्हणत मी त्याच्याबरोबर चकरा मारू लागलो. दोन वकरा होताच जरा जावून पडतो, उद्या भेटू असे म्हणत तो त्याच्या कोठडीकडे वळला. त्याची पाठ वळताच जणू वाट बघत असल्यासारखे चार- पाच जण माझ्या अंगावर धावून आले व फार मस्ती आली होय तुला, आता सर्व माज उतरवतो असे म्हणत व गलिच्छ शिव्या देत मला मारू लागले. बेसावध असल्याने सुरवातीचे दोन चार ठोसे मला जोरात बसले पण त्याची कळ डोक्यात भिनताच वर्षभर होत असलेल्या माझ्यावरच्या अन्यायाची चीड एकदम उफाळून आली. जणू काय माझ्यावरच्या अन्यायाला हेच जबाबदार आहेत अशा भावनेनी मी त्वेषाने प्रतिकार करू लागलो. त्यातील एक दोघांना लक्ष्य करून मी घणाघाती ठोसे मारले. इतका प्रतिकार त्यांना पण अपेक्षित नसावा. त्यांचे साथीदार तेवढ्यात धावून आले. इतक्या सर्वांना पुरून

उरायला मी काही हिंदी सिनेमाचा हिरो नव्हतो. साहजिकच त्यांनी मला क्षणार्धातच लोळवला व ते मला लाथाबुक्यांनी तुडवू लागले. या सर्व प्रकाराला फारतर चार पाच मिनिटे लागली असतील तेवढ्यात ऑफिसच्या दिशेने चार बंदूकधारी शिपाई एका जीपमध्ये स्वार होवून वेगाने आमच्याकडे आले. जवळ येताच चारजण बंदुका रोखून उभे राहिले व बाकी चारजण लाठ्या फिरवीत आमच्यावर तुटून पडले. दोनच मिनिटात त्यांनी मला व माझ्यावर हल्ला करणाऱ्या चौघांना जीपमधे कोंबले आणि जीप दवाखान्याकडे पिटाळली. मधल्या वेळात सर्च लाईटचे झोत घटनास्थळावर टाकण्यात आले होते आणि लॉउड स्पीकर वरून मैदानात फिरणाऱ्या सर्व कैद्यांना आपापल्या कोठड्यात जायला सांगण्यात येत होते.

दवाखाना ऑफिस जवळच होता. गडबडीच्या आवाजाने डॉक्टर व त्यांचे दोन सहाय्यक तयारीतच होते.

दवाखान्यात पोचताच डॉक्टरने माझा ताबा घेतला व परीचारकाला बाकीच्या चौघांना बघायला सांगितले. डॉक्टर महाशयांना स्वतःशीच बडबडायची सवय दिसली त्यानुसार त्यांची टकळी सुरू झाली. “अरे ही काय मारायची पद्धत झाली काय? कुठेही मारलेले दिसते. हात वर कर “हे मला उद्देशून होते. ” बर तर बर, डोळा थोडक्यात वाचला. पाय जवळ घे पाहू” आता यातले नक्की मला काय म्हणाले असावे हे मी अंदाजाने समजून त्याप्रमाणे करीत होतो.

“ठीक आहे. किरकोळ जखमा आहेत. फार काळजी करण्यासारखे काही दिसत नाही. नशिबाने फ्रॅक्चर पण दिसत नाही. तुझे फाऊंडेशन मजबूत असल्याने

तू वाचलास गड्या “डॉक्टर महाशयांनी शेवटी जाहीर केले आणि मलमपट्टी केली. तसेच सुरक्षा म्हणून एक पेन किलर ठोकले.

“थॅन्क्स टू रॉनी “मी मनाशीच म्हणालो.

“मला काही म्हणालात?” डॉक्टरने चमकून विचारले.

“ थॅन्क्स म्हणालो “मी कष्टाने म्हणालो.

गेल्या वर्षभरापासून जो माझा कोंडमारा व मुस्कटदाबी चालू होती तिला अचानकपणे मारामारीच्या निमित्याने वाट मिळाल्याने असेल पण मला विलक्षण हलके व मोकळे वाटत होते. एकप्रकारे त्या हल्लेखोरांनी माझ्यातील रागाला वाटच करून दिली होती. तेवढ्यात शिपायाने डॉक्टरला याला साहेबांकडे नेवू काय असे विचारले. अर्ध्या तासाने सर्वांनाच घेवून जा असे डॉक्टर महाशय बाकीच्या चौघांकडे बघत म्हणाले. झाले. बरोबर अर्ध्या तासाने आम्हाला जेलरसमोर उभे करण्यात आले. अजून पाच सहाजण पण आधीच हजार होते. आम्ही त्यांच्याबरोबर उभे राहिल्यावर जेलरनी एक दृष्टीक्षेप सर्वांवर टाकला व आम्हा पाच जणांना वेगळे उभे केले.

“मारामारी कोण करीत होते?” त्यांनी बाकीच्यांना विचारले.

सर्वांनी आमच्याकडे बोट दाखविले.

“तुला कोणी मारले?”त्यांनी प्रत्येकाला विचारले. यावेळी माझ्याकडे बोट दाखविण्यात आले.

"तुला कोणी मारले? "त्यांनी मला सर्वात शेवटी विचारले.

"मला निश्चित असे सांगता येणार नाही कारण मी कोणालाही ओळखत नाही आणि तेथे अंधार होता" मी शांतपणे उत्तरलो.

बहुतेक उत्तर पठडी बाहेरचे असावे कारण ते न आवडल्याचे त्यांच्या चेहऱ्यावरच्या भावाने मला कळले.

"तीन आठवडे काली कोठरी" त्यांनी माझ्याकडे बोट दाखवीत निर्णय जाहीर केला.

मारामारीमुळे मी पूर्णपणे तणावमुक्त झालो होतो आणि त्याचमुळे मी अगदी सहजपणे विचारले की ही काली कोठडी प्रकरण काय आहे. असे उलट विचारणे बहुतेक जेल मॅन्युअलमधे बसत नसावे हे मला शिपायाने ढोसले तेव्हा कळले.

"ते तुला तिथेच कळेल आणि तीन आठवड्या नंतर तुला सर्व नावे पण आठवतील फक्त तू ती सांगण्याच्या स्थितीत नसशील"

"मला वाटते कैद्याला शिक्षेचे स्वरूप सांगण्यास प्रत्यवाय नसावा".

"अजिबात नाही. तुला हे एकवीस दिवस पूर्णपणे एकांतवासात काढायचे आहेत. रोज फक्त पंधरा मिनिटे तुला बाहेर काढण्यात येईल. या दिवसात तुझ्याशी कोणीही बोलणार नाही आणि तुलापण कोणाशी बोलायची मुभा नाही "जेलर साहेबांनी नियम सांगितले.

ठीक आहे एवढेच म्हणून दोन शिपायांबरोबर मी काल कोठडीकडे निघालो. ही कोठडी जेलच्या मागील बाजुस थोडी दूर होती. साधारणपणे दहा मिनिटात आम्ही तेथे पोचलो. आत एक चाळीस वॅटचा दिवा मिणमिणत होता. मला आत सोडून दोघेही दार लॉक करून परतले. अंग ठणकत असल्याने तसेच इंजेक्शनच्या प्रभावाने मला ग्लानी येत होती त्यामुळे मी सरळ जमिनीवर लोळण घेतली आणि अर्ध्या क्षणातच झोपी गेलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी शिपायाने खिडकी गजांवर काठी वाजल्याने मला जाग आली. आता मला कालच्यापेक्षा बरे वाटत होते. दाराजवळ एक छोटी खिडकी होती. तिथे चहा व नाष्टा ठेवला होता. मी मुकाट्याने तो घेतला व खोलीचे निरीक्षण करू लागलो. खरं म्हणजे काली कोठडी म्हणण्यासारखे तिथे काही नव्हते. बाकी कोठड्यांसारखीच रचना होती फक्त खिडक्या जास्त उंचीवर होत्या त्यामुळे बाहेरचे काही दिसत नव्हते. कोणाशीही संपर्क नसल्याने कैदी वेडापिसा होत असावा आणि माझी पण तीच अवस्था व्हावी अशी जेलर साहेबांची इच्छा असावी.

कोणत्याही परिस्थितीत आपण मनाचा तोल ढळू द्यायचा नाही हा मी निश्चय केला. आता विचार करायला भरपूर वेळ असल्याने मी झालेल्या घटनांचा आढावा घेऊ लागताच एक धक्कादायक गोष्ट माझ्या लक्षात आली. मी जरी माझ्यावरच्या अन्यायाचा सूड घेण्याची भाषा करीत असलो तरी कसा सूड घेणार याची कसलीही रूपरेखा माझ्याकडे नव्हती. एव्हढेच काय कोणाचा सूड घेणार हे पण मला निश्चित माहीत नव्हते. याकरता काय करावे लागेल, ते ही बाहेर पडल्यावरच्या निष्कांचन

अवस्थेत हे तर काहीच कळत नव्हते. शेवटी मी मनाशीच ठरवले हे एकवीस दिवस आपण फक्त मनाच्या कंडिशनिंग करता उपयोगी आणायचे. हा एकांतवास ही देवानी दिलेली संधी मानायची व जास्तीत जास्त मन कणखर करण्यावर भर द्यायचा. त्याकरिता आवश्यक असलेले योगा प्रशिक्षण माझे झाले होते पण आतापर्यंत सलग सराव कधी करता आला नव्हता. चला, यातूनही काही चांगलेच घडेल.

या विचारात असता परत खिडकीवर काठी वाजली. आता जेवण आले होते. त्यानंतर मी लगेच ध्यानधारणा व योगाभ्यास सुरू केला. सरावाने मला शरीरातील बायोलोजिकल वॉच पण जागृत करता आले. सुरुवातीचे तीन चार दिवस जड गेले पण जसा सराव वाढला तसे मी ओंकार प्रणव सारखा प्रकार पण सहजगत्या एखादा तास करू लागलो. हे सर्व करतांना मला एकप्रकारचा विशेष आनंद व्हायचा. अर्थात हे अगदी सहजपणे झाले असेही नाही पण सावरकरांनी काय यातना सहन केल्या असतील आणि ते किती थोर होते याची जाणीव मात्र पदोपदी येत होती.

याचा परिणाम माझ्यावर नक्कीच चांगला होत होता पण पहाऱ्यावरच्या शिपायांना मात्र काहीतरी चुकत असल्याचे वाटत असावे. बहुतेक याआधीचे कैदी एकांतवास असहय्य होऊन ओरडत किंवा रडत भेकत असावेत त्यातुलनेत माझा आवाजपण बाहेर येत नव्हता. बरेचदा ध्यान लावून बसले असता कोणीतरी बारकाईने बघत असल्याची सूक्ष्म जाणीव व्हायची ती त्यांचीच चाहूलअसावी. काही दिवसात मी कालभान पण विसरलो. दिवसेदिवस मला उल्हसित वाटू लागले.

असेच एक दिवस सकाळी अकस्मात दार खाडकन उघडले व शिपाई दारातूनच चलो साबने बुलाया है असे जोरात ओरडला. चला, शिक्षा संपली वाटते असे मनाशीच म्हणत मी त्याच्याबरोबर निघालो.

ऑफिसमधे पोचताच जेलर साहेबांनी वाचत असलेली फाईल बाजूला ठेवून शिपायाला जाण्यास सांगितले. बहुतेक ते माझीच फाईल वाचत असावेत. किंचित कुतूहलाने त्यांनी माझ्याकडे बघितले आणि काय ताठा उतरला की नाही असे विचारले. ईतर वेळी मला कदाचित राग आला असता आणि मी चिडून काहीतरी उलट बोललो असतो पण तीन आठवडे जे काही करता होतो त्यामुळे असेल पण मला काही प्रत्युत्तर द्यावेसे वाटले नाही.

“मी आत्ता तुझीच फाईल वाचत होतो. तू हायकोर्टात अपील का नाही केले” त्यांनी विचारले.

मी काहीच बोललो नाही.

“मला वाटते की तुला कोणीतरी यात गोवले आहे ”

यावरही मी काही प्रतिक्रिया दिली नाही. तेवढ्यात त्यांचा फोन वाजला. घराचा असावा कारण आवाज एकदम नरम झाला. बर, बर मी फोन करतो म्हणत त्यानी फोन ठेवला व लगेच एक नंबर फिरवला. केव्हा येणार, आता दहा वाजले अशी त्यांनी फोनवर पृच्छा करताच पलीकडून काहीतरी उत्तर आले ते ऐकताच साहेबांचा चेहरा एकदम उतरला. ठीक आहे असे म्हणून त्यानी फोन ठेवला.

क्षणभर आमचे कैदी - जेलरचे नाते विसरून ते मला म्हणाले आता गुरुजी ऐनवेळी यायला जमणार नाही म्हणत आहे.

“कसली पूजा आहे” मी सहज विचारले.

“आज गणपती येणार, त्याची प्रतिष्ठापना करायची होती”

“होती नाही, आहे. तुमची हरकत नसेल तर मी पूजा सांगतो ”.

नको, नको असे ते गडबडून म्हणाले. मला जरा हसायला आले. पाच मिनिटा पूर्वी मला अपील का केले नाही असे विचारणारा माणूस कैद्याला गुरुजी म्हणून बोलवायला काचकुच करीत होता.

“का, एका कैद्याला गुरुजी म्हणून कसे बोलवायचे असेच ना?”

“तसे नाही पण ते नियमात बसत नाही ”

“या सबंधी कसले नियम आहेत? आणि तुमचा बंगला तर तुरुंगाच्या आवारातच आहे ”

त्यांच्या चेहऱ्यावर चलबिचल स्पष्ट दिसत होती. शेवटी मी स्पष्टच बोललो “बघा साहेब, तुमचा वैयक्तिक प्रश्न आहे पण हेच मी तुम्हाला धोतर, नेहरू शर्ट आणि डोक्यावर काळी टोपी घालून विचारले असते तर तुम्ही ताबडतोब हो म्हणाला असता ”.

हे ऐकल्यावर ते पटकन म्हणाले की मी या कपड्यांची सोय करतो. हे तू इथेच घाल व माझ्याबरोबर घरी चल. त्याला मी ठाम नकार दिला.

" का, त्यात काय अडचण आहे?" ते रागात म्हणाले.

"पुजेसारख्या पवित्र विधी करतांना खोटेपणा करायला मला जमणार नाही. ती तुमच्या मिसेसशी प्रतारणा होईल" मी ठामपणे म्हणालो.

"मग काय मार्ग आहे?"

"तुम्ही वहिनींना फोन करा. माझा पर्याय त्यांना सुचवा व निर्णय त्यांच्यावर सोडा "मी शांतपणे म्हणालो.

क्षणभर ते माझ्याकडे बघत बसले. मला कसली सक्ती ते करू शकत नव्हते. नाईलाज झाल्याने त्यांनी फोन उचलला. ठरल्याप्रमाणे बोलले व दहा मिनिटात काय ते कळव असे म्हणाले आणि फोन खाली ठेवला.

आता दहा मिनिटे मला थांबवणे त्यांना भाग होते. नाईलाजाने त्यांनी मला बसायला सांगितले.

"खरे म्हणजे मी तुला दुसऱ्या कामाकरीता बोलावले होते"

"कोणत्या?"

"हे बघ, इथे एक – दोन वर्षे शिक्षा झालेले काही तरुण कैदी आहेत. शिक्षेमुळे त्यांच्या शिक्षणात खंड पडतो. बाहेर पडल्यावर बरेच जण शिक्षण अर्धवट सोडून देतात आणि गुन्हेगारीचा मार्ग पत्करतात. जर तू त्यांना काही अभ्यासात मदत केली तर मी प्रशासनाची परवानगी घेवून त्यांच्या परीक्षेला बसण्याची सोय करेन. तू मदत करशील काय?"

“ जरुर करेन “या माणसाबद्दल मी किती चुकीचे मत केले होते हे आठवून मी अपराधी भावाने म्हणालो.

तेवढ्यात फोन वाजला. त्यांनी माझ्याकडे अर्थपूर्ण नजरेने बघितले व फोन उचलला. पलिकडून बहुधा माझ्याबद्दल काही अधिक माहिती विचारली असावी. त्यांनी मी खात्री देतो, घरी आल्यावर सविस्तर सांगेन असे म्हणून फोन ठेवला व मला चलण्याची खूण केली. बरोबर अर्थात् शिपाई होताच. बंगला तुरुंगाच्या आवारातच होता. पाच मिनिटातच आम्ही घरी पोचलो. व्हरांड्यात मालकिणबाई आमच्या स्वागतार्थ उभ्या होत्या किंवा आपल्या पतीराजांनी काय पात्र धरून आणले हे पण बघायचा उद्देश असू शकतो. जेलरसाहेबांच्या अगदी विरुद्ध होत्या. म्हणजे जेलर जितके सोज्वळ आणि साध्या चेहऱ्याचे होते तितक्याच या करारी आणि कडक वाटल्या.

आमचे त्रिकुट बघताच त्यांनी माझ्याकडे बोट दाखवून तुमच्या करता धोतर, पंचा व टॉवेल मागील बाजूला हौदाजवळ ठेवले आहे. पटकन आंघोळ उरका व पूजा सुरू करा, आधीच उशीर झाला आहे असे बजावून उत्तराची अपेक्षा न करता आत निघून गेल्या. व्हायोला, मराठी व्हायोला मी मनाशीच म्हणालो पण सांगिल्याप्रमाणे सर्व उरकून परत अंगणात आलो.

साहेबांनी माझी राहिलेली ओळख मधल्या काळात घरी करून दिलेली असावी. माझी चाहूल लागताच त्यांनी आतूनच नरेन आत ये असा आवाज दिला. मी त्याप्रमाणे आत गेलो. देव्हाऱ्या जवळ पूजा मांडली होती व साहेब सोवळे नेसून

तयार होते. मी मंत्रोच्चार करून फक्त जानवे बदलले व विशेष वेळ न घालवता मी मंगलं भगवान विष्णु असे म्हणत पूजेला सुरुवात केली. पहिले काही मंत्रोच्चार होताच एक आज्जी व दोन लहान मुले येवून बसली. मराठी व्हायोलाने पण एक दोन फेऱ्या मारून गुरुजी असली असल्याची खात्री करून घेतली. माझे याकडे अजिबात लक्ष नव्हते. मी पूजा करायला मिळाली या आनंदात होतो. सवईनुसार मी प्रत्येक मंत्र व त्याचा अर्थ सांगत होतो. यथासांग पूजा झाल्यावर आरती नंतर प्रसाद दिला. नंतर साहेबांना दक्षिणा विधी समजावून आणि दक्षिणा मागितली.

त्यावर अरे नरेन असे साहेब म्हणताच अहो, गुरुजी म्हणतात ते बरोबर आहे आणि पूजा होईपर्यंत तुम्ही त्यांच्याशी एकेरीत बोलू नका आणि हो गुरुजी जेवूनच जातील असे मराठी व्हायोला मागून कडाडल्याच.

माझ्याकडे खावू का गिळू अश्या नजरेने बघत साहेबांनी पाचशे रुपयांची दक्षिणा दिली आणि गुरुजींना घाई असल्याने त्यांचे पान प्रथम घेण्यास सांगितले.

बऱ्याच दिवसांनी मी सुग्रास जेवलो. जेवण झाल्याबरोबर मात्र मी आता मी निघायला हवे असे साहेबांना म्हणालो व एक मिनिट ताईंना बोलावता काय असे असे विचारले. आता काय नवीन असे ते विचारणार तेवढ्यात ताईच बाहेर आल्या.

त्या येताच मी उठून उभा राहिलो.

“छान झाली हो पूजा” मी न विचारता त्या म्हणाल्या “आमचे नेहमीचे गुरुजी पण एवढी यथासांग सांगत नाही”

“त्यांना घाई असेल शिवाय प्रत्येकाची पद्धत असते”

“पण पूजा झाल्यावर प्रसन्न वाटले पाहिजे जसे आज वाटते. हो किनई हो ”

“ हो, ते खरेच आहे “साहेब नाईलाजाने बोलले.

ठीक आहे असे म्हणून मी दक्षिणेची पाचशेची नोट ताईकडे देत म्हणालो “मला जेव्हा लागतील तेव्हा परत मागेन. तोवर तुमच्याकडेच असू द्या”

असे म्हणून मी कपडे बदलण्यास गेलो.

शिपायाने मला कोठडीत सोडले आणि तो निघून गेला. आत पाय ठेवताच मला वातावरणातील फरक जाणवला. मागील वेळी मला स्विकारायला माझे सहकारी तयार नव्हते पण आज मात्र आवो पंडित अशी गर्जना करून माझे स्वागत झाले. बहुतेक माझ्या पूजेची कथा आधीच प्रसारित झाली असावी. जेल मध्ये कोणतीही गोष्ट फारशी गुप्त राहत नसते हे मला नंतर कळले. मला सन्मानाने ओट्यावर बसवल्यावर मला खरे कारण सांगण्यात आले. त्या दिवशी जेवण झाल्यावर जेव्हा माझ्यावर हल्ला झाला होता तेव्हा हे चौघेही जरा दूर होते आणि माझ्या मदतीला धावले पण होते पण त्यांना जरा उशीर झाला होता. मला जरी ती घटना चार पाच मिनिटांची वाटली तरी प्रत्यक्षात एक मिनिटही चालली नव्हती. हे जेव्हा पोचले तेंव्हा शिपायांनी आमच्या मुसक्या आवळल्या होत्या.

त्यांना विशेष कौतुक वाटायचे कारण एवढेच होते की मी कोणालाही न गुंतवता एकांताची_शिक्षा पत्करली आणि खंबीरपणे पूर्ण केली. माझा तेथील दिनक्रम पण आधीच प्रसारित झाला होता त्यामुळे मला पंडित ही पदवी प्रदान करण्यात आली होतो. थोडा जोश कमी झाल्यावर आम्ही परिचय करून घेतला. सर्वात सिनियर म्हणजे उमर, साधारण पन्नाशीच्या घरात असावा, मुन्ना भाईच्या टोळीतील सक्रिय सभासद, खुनाच्या आरोपावरून जन्मठेप. एवढी ओळख पुरेशी होती. दुसरी व्यक्ती मात्र गुन्हेगारी पार्श्वभूमीची वाटत नव्हती आणि प्रत्यक्षात पण नव्हती. शिरपूरचे प्रख्यात बागाईतदार जयसिंग पाटील. हे नाव कुठेतरी ऐकल्यासारखे वाटत होते. नंतर उमरनेच ओळख करून देत असता यांचे इतर पण अनेक व्यवसाय आहेत हे सांगितले तेव्हा मला आठवले की मी शिरपुरला दोन महिने होतो तेव्हा बँकेत त्यांना बघितले होते. त्यांना एवढे जुने आठवणे अर्थात् शक्य नव्हते. ते पण भाऊबंदकीच्या केसमध्ये अडकल्याने चार वर्षे आत होते. बाकीचे दोघे मात्र भुरटे चोर, खिसेकापू या वर्गातले होते. येथे हे मात्र आवर्जून सांगितले पाहिजे की जेलमध्ये तुमचा दर्जा तुम्ही केलेल्या गुन्ह्यांवर अवलंबून असतो म्हणजे असे की जेव्हढा गुन्हा मोठा तेव्हढा तुमचा इतर कैद्यामधे तुमचा वट, दरारा जास्त. त्यातही एखादे उदात्त कारण, जसे कोणाची अब्रू वाचवण्यासाठी वगैरे असले तर प्रश्नच नाही. अपवाद फक्त बलात्कारी गुन्हेगारांचा. त्यांचा मात्र तिरस्कारच केल्या जातो, अगदी सर्व थरातून. असो, नंतर उमरने अपरिहार्य प्रश्न केलाच. तो म्हणजे माझा काय गुन्हा होता हा. तशी त्यांना माहिती असेलच पण माझ्याकडून खात्री करायची असेल.

मलापण इतक्या तज्ञ मंडळीसमोर माझी बाजू मांडायची संधी कधी मिळणार होती. मी पण थोडक्यात माझी कथा सांगितली. शेवटी मीच जरा भावनाविवश झालो व ताण असह्य झाल्याने डोके गच्च धरून बसलो. निर्दोष व्यक्तीला सजा झाल्याचे या मंडळींनी आधी कधी ऐकले नसेल असे नाही पण संबधित व्यक्ती स्वतः सांगतोय आणि आपण ऐकतोय असा प्रसंग बहुधा पहिलाच असावा. त्यामुळेच असेल कदाचित पण नंतर पाच मिनिटे कोणीच काही बोलले नाही. हळूच माझ्या पाठीवर हात ठेवून उमर म्हणाला

"पंडित, अपने आप को संभालो. "

"काय सांभाळू? मी काय असे कोणाचे वाईट केले होते की माझा संसार सुरू व्हायच्या आधीच उध्वस्त झाला ".

"झाला नाही केल्या गेला "जयसिंग म्हणाले.

"म्हणजे?" मी चमकून विचारले.

"दुरुस्त है, मला तुम्हा पढे – लिखे लोकाची पद्धत कळत नाही पण तुला कोणीतरी यात पद्धतशीरपणे अडकवले आहे ".

"पण कोणी?"

" हे तर वकीलच सांगू शकेल ".

"आता इथे कोण असा वकील भेटेल "मी हताशपणे म्हणालो.

माझा उडालेला गोंधळ बघून उमर हसून म्हणाला “अगदी वकील नाही पण वकिलापेक्षाही जास्त डोके असलेला एकजण आपल्या जेलमधे आहे”. त्याची सर्व हयात कोर्टात गेली असल्याने तो उमरच्या भाषेत नंबर वन होता.

पण तो इथे कसा येणार या माझ्या बाळबोध शंकेवर उत्तर देणे उमरला जरुरी वाटले नाही.

चारच दिवसांनी हे वकील महाशय आले. साधारण पन्नाशीचा गृहस्थ, उणीपुरी पाच फूट उंची, किरकोळ शरीरयष्टी, सोडावॉटर बॉटल च्या काचेचा चष्मा, हातात एकदोन फाईल दिल्या तर कोणत्याही सरकारी ऑफिसमधे सहज खपून जातील असा अवतार प्रवेश करते झाले. राम राम, दुआ, आदाब वगैरे गोष्टी होताच उमरने इसकी स्टोरी सुन और जरा गाईड कर असा आदेश दिला.

परत मी माझी रामकहाणी सांगितली. ती ऐकतांना त्यांनी डोळे मिटून घेतले होते. पूर्ण सांगितल्यावर पण डोळे मिटलेच होते. मला तर यांना झोप लागली की काय असे वाटू लागले. तेवढ्यात त्यांनी डोळे उघडले व परत एकदा अगदी बारीसारीक घटना पण न सोडता क्रमाने परत सांग अशी सूचना केली. मी तशापण सांगीतल्यावर त्यांनी मला सर्व संचालकांची नावे, वय आणि व्यवसाय विचारले. नंतर संचालकांशी विशेष घसीट असणाऱ्या कर्मचाऱ्यांची नावे विचारली. एवढी माहिती तर माझ्या वकिलाने पण कधी विचारली नव्हती. हीच व्यक्ती आपली वकील असती तर बरे झाले असते असे मला आपले उगीच वाटून गेले. आता पुरेशी माहिती दिली असे वाटत असतानाच त्यांनी विचारले

“तुम्ही बुडीत कर्जे वसूल करण्यासाठी काही वेगळे प्रकार करत होता असे काहीतरीमधे पेपरला आले होते, ते खरे आहे काय?”

“ होय, ज्यांनी एकही हप्ता दिला नाही किंवा ज्यांची थकबाकी जास्त आहे आणि जे नोटिसीला पण दाद देत नव्हते त्यांच्या घरावर आमचे वसुली पथक वाजंत्री व थकबाकीचे फलक घेवून जायचे. ठोक आश्वासन मिळाल्याशिवाय वाजंत्री बंद करायची नाही अशी त्यांना सूचना होती “.

“मग त्याच्यामुळे काही वसुली झाली?”.

“ नाही, उलट थकबाकीदारांनी कोर्टाकडून या प्रकारे वसुली करण्यास मनाई हुकूम आणला”.

“पण यामुळे बरेच थकबाकीदार त्यात संचालक पण आले दुखावले असतील“.

“ होय तशी शक्यता आहे “.

मग सर्वांना उद्देशून ते म्हणाले बँकेची सध्याची माहिती मी दोन आठवड्यात काढतो नंतर आपण परत भेटू आणि ते गेले.

दोन आठवड्यानंतर मात्र ते स्वतःहूनच आले.

पंडित, बातम्या काही चांगल्या नाहीत "त्यांनी सुरवात केली "एकतर तुला सजा झाल्यापासून लोकांनी ठेवी काढायला सुरवात केली दुसरे म्हणजे कर्जवसुली जवळपास शून्य झाली आणि भागधारकांनी आरडाओरडा करायला सुरवात केली. रिझर्व्ह बँकेने रीतसर प्रशासक नेमला आहे".

"म्हणजे आता तीन चार वर्षे बघायला नको. नंतर पण विलीनीकरण हा एकमेव पर्याय, जर एखादी बँक तयार झाली तर"मी निराशेने म्हणालो.

"त्यातले मला काही कळत नाही पण परिस्थिती अशी आहे. बँकेने स्वेच्छानिवृत्ती जाहीर केली आहे. बघुया काय होते "

"काही झाले तरी छोटे ठेवीदार बुडाले बघा ".

"आणि हो तुला आपल्या मार्गातून हटविणारे जे दोघेजण आहेत त्यांचीपण नावे मला कळाली आहेत".

"देव आणि बरडीया आणखी कोण?"

"चूक, ते तर तुला सावध करीत होते".

"मग कोण?"

"शर्मा आणि संचालक किसन गोरडे".

"काय, हे कसे शक्य आहे?" मी आणि जयसिंग दोघे ही एकदम म्हणालो.

"सांगतो. तुला पंधरा लाख भरायचा पर्याय जेव्हा देवसाहेबांनी दिला तेव्हा ही गोष्ट ऑडिटर, देव आणि बरडीया यांना सोडल्यास कोणालाही ठावूक नव्हती ".

“ बरोबर आहे”

“शर्मा तुला भेटायला आले तेव्हा तेच तुला म्हणाले कळल्याबरोबर आलो, कोणालाही भेटलो नाही“

“हे पण बरोबर आहे “

“मग त्यांनी नेमके पंधरा लाख भरून मोकळे व्हायचा सल्ला कसा दिला? त्यांना हीच अचूक रक्कम कशी कळली?”

“शर्मा आणि किसन याचे आधीपासूनच लागेबांधे होते. तुमच्या वसुली पथकाला यश न मिळण्याचे कारण पण शर्माच होते. किसन एक गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेला बांधकाम व्यावसाइक आहे. त्याला कायम पैशाची गरज असते. संचालक बनून जेवढा हात मारता येईल तेव्हढा हात मारता येईल तेव्हढा मारणे हा एकमेव उद्देश घेवून येनकेन प्रकारे तो संचालक झाला. तुझ्या कारवायांमुळे त्याला आणि पर्यायाने शर्मांना पण काम करणे कठीण झाले म्हणून त्या दोघांनी मिळून तुला बरोबर अडकवले”.

“मला अजूनही खरेच वाटत नाही”.

“मग शर्माची बायको खरंच आजारी होती काय ही चौकशी तू स्वतःच कर. पाहिजे असल्यास तू ही सर्व माहिती दुसऱ्या कोणाकडूनही पडताळू शकतोस. म्हणजे तुमच्या भाषेत सेकंड ओपिनियन ”.

“नाही तसे नाही पण अनपेक्षित असल्याने मी भांबावून गेलो आहे “मी कसाबसा म्हणालो.

होते असे कधी कधी असे म्हणून तो निघून गेला.

त्यानंतर विचार करून माझे डोके दुखू लागले. कितीही आणि कसाही विचार केला तरी त्याच्या तर्कसंगत मांडणीत मला दोष काढता येईना. त्यामुळे माझा त्रास अजूनच वाढू लागला. शेवटी न राहवून जयसिंग मला रागावले व स्वतःला सावरण्यास सांगितले.

नंतर मात्र मी स्वतःला खरेच सावरले. नाहीतरी माझ्या इथल्या त्राग्याने काय साध्य होणार होते? त्यातच जेलरसाहेबांनी आधी सांगितल्याप्रमाणे चार कैद्यांची परीक्षेची तयारी करून घेण्याचे काम माझ्याकडे दिले. त्यामुळे मला बाकीच्या कामातून बरीचशी सुट मिळाली. येथे हे पण सांगितले पाहिजे की जेलची दुनिया ही खरंच एक वेगळीच दुनिया असते आणि तिचा अनभिषिक्त सम्राट असतो जेलर. तो करेल तो कायदा आणि तो सांगेल तो नियम. शिक्षा ही माणसाला सुधारण्यासाठी दिलेली एक संधी असते आणि त्याचा पुरेपूर उपयोग करायला हवा यावर विश्वास ठेवून काम करणारे सानप साहेबांसारखे अधिकारी दुर्मिळ असतात.

असो, पंडितचे आणि साहेबांचे चांगले संबंध आहेत एवढी गोष्ट माझापण मान इतर कैद्यांमध्ये वाढवण्यास पुरेशी होती. बऱ्याच दिवसांनी शिकवायची संधी

मिळाल्याने मलापण छान वाटत होते. जे चारजण परीक्षा देणार होते ते मन लावून शिकत होते.

त्यांच्याशी व इतरांशी बोलतांना हे लक्षात आले की याचे गुन्हे तसे किरकोळ या सदरात मोडणारे होते पण केवळ न्यायालयीन दिरंगाईमुळे हे अडकले होते. जेलमध्ये खरंच त्यांना योग्य मार्गदर्शन मिळाले नसते तर ते गुन्हेगारी मार्गाकडे खेचले गेले असते. सानप साहेबांनी रीतसर परवानगी काढली, पुस्तकांची सोय केली व एकप्रकारे त्यांना वाचवले. यथावकाश परीक्षा झाली, निकाल लागला आणि सगळे पास झाले. एक चांगला उपक्रम राबवला म्हणून सानप साहेबांची वाहवा झाली. त्यांनी पण मोकळ्या मनानी मला श्रेय दिले. नंतर ही प्रथाच झाली. शिक्षा पूर्ण झाल्यावर त्यातील काहीजण सानपसाहेबांना भेटायला पण यायचे. त्यांचे ठीक चालले आहे हे ऐकून आम्हाला बरे वाटायचे.

शिक्षेच्या दुसऱ्या वर्षीच मला अचानक सानप साहेबांनी बोलावले. ऑफिसमधे पोचताच वातावरण जरा वेगळेच वाटले. मला बसायला सांगून त्यांनी एक पोस्टकार्ड मला दिले. मामांनी त्याच्या किरट्या अक्षरात आई गेल्याचे लिहिले होते. वाचल्यावर साहजिकच माझे डोळे भरून आले.

“थोडी आधी कल्पना दिली असती तर तुझी भेटण्याची सोय केली असती” जेलर सहानुभूतीने म्हणाले.

“काही उपयोग झाला नसता. मामांनी पण विचारले असेलच” मी त्रोटकपणे म्हणालो.

जड पावलांनी मी परतलो. अशी काय मोठी स्वप्न माझ्या आईने बघितली होती? कष्ट करून मुलाला वाढवले, त्याचा संसार बघणे तर सोडाच पण शेवटी मलापण बघणे तिच्या नशिबात नव्हते.

उमर आणि जयसिंगने शक्य तेवढे सांत्वन केले. त्याच दिवशी रात्री आम्ही तिघेही एकत्र बसलो असता कधी नव्हे तो चिडून उमर म्हणाला "पंडित, तुझी ज्यांनी अशी दशा केली त्यांना सोडू नकोस "

"पण मी काय करू शकतो? बाहेर पडल्यावर माझ्यापाशी ना पैसा ना अधिकार राहणार. नोकरि धंदा काही करतो म्हटले तर माझ्यावर विश्वास तरी कोण ठेवणार?"

जयसिंग शांतपणे म्हणाले "असा अगदीच धीर सोडू नकोस उलट मिळालेला वेळ तुझे ज्ञान वाढविण्यासाठी वापर. तू बेसावध असल्याने त्यांना तुला फसविणे सहज जमले. आता तू पूर्ण तयारीनिशी उतर आणि त्यांना विचार करण्याची पण संधी देवू नको. त्यांच्यापेक्षा तुझ्याकडे नक्कीच जास्त बुद्धिमत्ता आहे. काय कसे वगैरे देवावर सोड".

मी जसजसा विचार करू लागलो तसे मला त्यांच्या म्हणण्यात तथ्य वाटू लागले.

आमच्या कोठडीसमोरच पाण्याचा हौद होता. त्याचा सर्वजण वापर करीत असत. साधारणपणे वर्दळ कमी झाल्यावर एक चाळीशी दरम्यानचा गोरापान माणूस शांतपणे आपली आंघोळ उरकून जायचा. तो कोणाशीही बोलत नसे. मी

कुतुहलाने एक दिवस त्याला अडवले. नंतर आम्ही सवडीने भेटलो. तो गृहस्थ म्हणजे त्यावेळी गाजलेल्या राम कॉम्प्युटरचे मालक राम शेट्टी होते. प्राथमिक परिचय झाल्यानंतर अपरिहार्य प्रश्न आपण इथे कसे हा येताच आम्ही एकमेकांना आपापल्या कथा सांगितल्या. माझी कथा ऐकून त्यांचेपण मत वकिलासारखेच पडले. त्यांची कथा मात्र फारच वेगळी होती. आपण इथे कसे आलात या प्रश्नावर ते एक उसासा सोडून ते म्हणाले की मी येथे स्वेच्छेनी आलो. आतापर्यंत ऐकलेल्या सर्व उत्तरांपेक्षा हे उत्तर वेगळे वाटल्याने मी कुतुहलाने ते कसे काय विचारले.

"त्याचे झाले असे "त्यांनी सांगायला सुरुवात होते केली "माझी राम कॉम्प्युटर म्हणून कंपनी होती. ती फारच चांगली चालली होती. माझ्या मित्रांनी या कंपनीला पूरक म्हणून दुसऱ्या क्षेत्रात एखादी कंपनी काढ असे माझ्या डोक्यात भरवून दिले. मी पण खुळ्या सारखा त्याला भरीस पडलो. बांधकाम क्षेत्र जे मला पूर्ण अपरिचित होते त्यात मी गुंतवणूक केली. बरोबर एखादा माहितगार असावा म्हणून मी त्या क्षेत्रातील एकजण, किसन गोरडे त्याचे नाव, याला भागीदार म्हणून घेतले".

"कोण म्हणाला तुम्ही "मी चमकून विचारले.

"अगदी हीच प्रतिक्रिया तेव्हापण सगळेजण हे नाव ऐकताच देत होते पण मला कळले नाही आणि जेव्हा कळले तेंव्हा फार उशीर झाला होता. बऱ्याच तक्रारी आल्यावर मी जेव्हा हिशोब बघितला तेव्हा किसन नी भरपूर अफरातफर केली होती. मी त्याला ताबडतोब नारळ दिला पण झालेला घोळ निस्तरणे भाग होते".

“मग?” मी विचारले.

“राम कॉम्प्युटर चांगली नफ्यात होती त्यामुळे मी यातून सहज बाहेर पडेन असे मला वाटत होते. बांधकाम क्षेत्रात कितीही पैसा ओतला तरी तो जिरतो हे मला ठावूक नव्हते. राम कॉम्प्युटरचा शेअर जोरात होता. मी शेअर्स गहाण ठेवून पैसा उभा केला आणि नेमकी दोन्ही क्षेत्रात मंदी आली. ”

मला हे प्रकरण अलिफ लैला, हातीमताई पेक्षा सुरस वाटू लागले होते म्हणून मी मग काय झाले असे नकळत विचारले.

“तू फक्त त्या धृतराष्ट्राप्रमाणे फक्त काय झाले, काय झाले असे विचारत रहा” रामू सर किंचित गंमतीने म्हणाले.

“तसे नाही पण एवढे चढउतार मी कधी ऐकले नव्हते म्हणून विचारले “मी वरमुन म्हणालो.

“अरे गंमत केली. बरे तर जास्त कर्ज उचलण्यासाठी शेअर्सची किंमत जास्त पाहिजे म्हणून मी कंपनीचा नफा वाढवून दाखवला ”.

“ऑडिटर नी आक्षेप घेतला नाही?”

“तिप्पट फी मिळाल्यावर कोण आक्षेप घेईल? असे एक नाही, दोन नाही तीन वर्षे चालले होते. मी माझ्या पत्नीच्या व नातेवाईकांमध्ये शेअर्स विभागून ठेवले होते. तिसऱ्या वर्षी माझ्या लक्षात आले की माझ्या पत्नीचा हिस्सा जर मी पूर्ण विकला तर

परिस्थिती पूर्वपदावर येवू शकते म्हणून मी तिला विश्वासात घेवून सर्व सांगितले आणि हिस्सा विकण्यास सुचविले. त्यावर ती काय म्हणाली ठावूक आहे?".

यावेळी उत्तर माहिती असून पण मी विचारले नाही.

किंचित विषादाने नकारार्थी मान हलवून ते म्हणाले "तुमचे घोळ तुम्ही निस्तरा त्यासाठी माझ्या पैशाची वाट लावू नका. त्या क्षणी माझे डोळे उघडले. परत एकदा वाल्याचा वाल्मिकी झाला. दुसऱ्याच दिवशी मी प्रेस मीटिंग घेतली व सर्व माहिती जाहीर केली. मग रीतसर चौकशी, अटक आणि शिक्षा. स्टोरी खतम".

"तुमचा ऑडिटर?"

"त्याचं लायसन्स तीन वर्षांकरिता जप्त झाल, राम कॉम्प्युटर सद्भाव कॉम्प्युटर मध्ये विलीन झाले, कोणाचीही नोकरी गेली नाही. इथे मला शांत झोप लागते"

"घरचे?"

"माहीत नाही"

काही क्षण असेच शांततेत गेले.

नंतर मी हळुच म्हणालो "सॉरी, मी उगाच तुमच्या जखमेवरील खपली काढली".

"काही हरकत नाही उलट सर्व बोलल्यानंतर मला मोकळे वाटले".

"तुमची हरकत नसेल तर तर मला शेअर बाजाराची माहिती द्याल काय?"

“जरुर, का नाही? पण उपयोग जपून कर”

त्यानंतर जसा वेळ मिळेल त्याप्रमाणे त्यांनी मला अगदी चांगले शेअर्स कसे निवडावे इथपासून ते फेक रॅली कश्या ओळखाव्या, शेअर्स कॉर्नर करणे म्हणजे नक्की काय असते अश्या सर्व गोष्टी ज्या कोणत्याही संस्थेत शिकवत नाहीत त्या विस्ताराने शिकवल्या. अखेरीस एक दिवस ते मला म्हणाले की प्रत्यक्ष अनुभव सोडला तर माझ्याकडे सर्व माहिती होती आणि त्याकरता बाहेरच्या जगात जाईपर्यंत थांबणे भाग होते. किसन बद्दल जेवढी माहिती, त्याचे कच्चे दुवे त्यांनी मला सांगितले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे कोणत्याही परिस्थितीत डोके शांत कसे ठेवायचे हे शिकवले.

असेच दिवसा मागुन दिवस, महिन्यामागुन महिने आणि वर्षामागुन वर्षे जात होती आणि दररोज माझी प्रतीशोधाची भावना तीव्र होत होती.

---

## सुटका

अखेरीस माझ्या सुटकेचा दिवस उगवला. त्या आधी एक आठवडा माझ्या मनात संमिश्र भावना दाटून येत होत्या. कारण कोणतेही असो इथल्या लोकांबरोबर आपुलकी वाढली होती. अगदी वास्तूशी पण जवळीक वाटत होती. हे सर्व सोडून जावेच लागणार आहे हे माहीत असून देखील. मित्राबद्दल तर बोलावयासच नको. अमिरने एक नम्बर दिला व कसलीही मदत लागल्यास वापरण्यास सांगितले अर्थात जेव्हा ताकत वापरायची गरज पडेल तेव्हा. त्याच्या भाषेत या पढेलिखे लोकांना नुसता दमच पुरेसा होता. जयसिंगने प्रथम त्यांच्या घरी जावून आराम करण्यासाठी सांगितले. रामू सरांनी तर त्यांच्या खास विश्वासातील माणसाचा पत्ता व नंबर दिला. माणूस शेअर् मार्केटमधील तज्ञ होता हे सांगणे नलगे. मी त्यांना माझ्या विद्यार्थ्यांची काळजी घेण्याची विनंती केली. तसे आम्ही बरोबरच शिकवत होतो त्यामुळे वेगळे सांगायची गरज नव्हतीच.

ठरल्या दिवशी ऑफिस मधील सोपस्कार पार पडल्यावर माझ्या हातात रिलिज नोट आणि मी जेलमधे केलेल्या कामाचा मोबदला रोख ₹ दोन हजार माझ्या हातात ठेवीत जायच्या आधी तुझ्या ताईला भेटून जा असे त्यांनी सांगितले. बहुधा असा निरोप त्यांनी आयुष्यात प्रथमच दिला असेल. त्याप्रमाणे मी त्यांच्या घरी गेलो. ताई वाटच बघत होती. मला बघताच तिच्या डोळ्यात पाणी आले. मला थांबायला सांगून ती आत गेली व लगेच गरमागरम उपमा, चहा घेवून परतली. इथे

बोलून काही उपयोग नव्हता म्हणून मी निमुटपणे खाण्यास सुरवात केली. माझे खाणे होईपर्यंत ती परत एकदा आत गेली व येतांना एक छोटी अँटॅची घेवून आली. ती अँटॅची मला देत ती म्हणाली की आजपासून ही वापर. इथेपण बोलण्यात अर्थ नव्हता. मी अँटॅची घेतली तोच एक लिफापा माझ्या हातात देत ती म्हणाली हे तुझे माझ्याकडे असलेले पैसे. लीफापा जरा जास्तच जाड वाटला म्हणून यावेळेस मात्र मी बोललो की की ताई पैसे जरा जास्तच वाटतात त्यावर तिने ही माझी भेट आहे नाही म्हणू नकोस असे ठणकावले.

मग मात्र मी तिच्या पाया पडलो यशस्वी हो असा आशीर्वाद तिने दिला यापेक्षा चांगला शुभारंभ कोणता असू शकेल?

बाहेर आल्यावर सर्वात प्रथम फरक जाणवला तो रहदारीचा. सात वर्षापूर्वी रहदारी तुरळक म्हणता येईल अशीच होती आता मात्र प्रचंड झाली होती. प्रत्येक जण कसल्या तरी घाईत होता, माणसे, वाहने गतीने येत जात होती. कुठे कशाला त्यांचे त्यांनाच ठावे. फक्त मलाच कसली घाई नव्हती म्हणून मी पण रमत गमत शहरात जायचे ठरविले. साधारण अर्धा तास चालल्यावर अचानक समोरून येणारा एक तरुण मला बघून थांबला व त्याने मला आपणच नरेन जोशी आहात काय असे विचारले.

अचानक विचारलेल्या या प्रश्नाने मी इतका दचकलो की मला हो, नाही असे काहीच बोलायला जमले नाही. एक तर सात वर्षात माझ्यात बऱ्यापैकी फरक

पडला आहे त्यामुळे कोणी ओळखणार नाही असे मला वाटत होते तो भ्रम तूटला आणि दुसरे म्हणजे मी त्याला अजिबात ओळखले नव्हते.

माझा उडालेला गोंधळ बघून तो किंचित हसून म्हणाला 'अहो सर मी शाम. तुमच्याबरोबर बँकेत होतो ना शर्मासाहेबांच्या जागेवर?' त्यानी असे म्हणताच मला ओळख पटली. किंचित ओशाळून मी अरे खरंच की. माफ कर मी तुला ओळखले नाही असे म्हणालो.

"अहो सर त्यात काय एवढे, चला आपण माझ्या घरी जाऊ. मला तुमच्याशी खूप बोलायचे आहे. माझे घरचे पण तुम्हाला भेटून खुश होतील"

"आता नको नंतर कधीतरी नक्की येईन "मी हात सोडवित म्हणालो.

त्याला माझी मनः स्थिती कळाली असावी.

"मग निदान आता माझ्याबरोबर जेवायला तरी चला. इथे जवळच एक छान हॉटेल आहे"तो अजिजीने म्हणाला.

मला नाही म्हणवेना. त्याला काहीतरी सांगायचं होते हे नक्की. आम्ही दोघेही हॉटेलमधे गेलो. बसल्याबरोबर काहीतरी आठवल्यासारखे करून तो म्हणाला सर मी पाच मिनिटात आलोच. असे म्हणून तो पळतच बाहेर गेला. तो येईपर्यंत मी हॉटेल मधल्या आवाजाशी समरस होण्याचा प्रयत्न केला कारण एवढा आवाज ऐकायची माझी सवय मोडली होती. तो परत येताच मला नुसतेच बसलेले बघून त्याने विचारले "हे काय? तुम्ही अजून ऑर्डर दिली नाही?"

मेन्यू कार्ड त्याच्याकडे सरकवत मी म्हणालो “अरे बऱ्याच गोष्टी बदललेल्या दिसत आहे. काही कळेना म्हणून तुझ्याकरता थांबलो”.

त्यावर त्याने हसून भराभर सराईत पणे ऑर्डर दिली. ऑर्डर येईपर्यंत वेळ होता म्हणून तो सांगू लागला. “सर, तुम्ही गेल्यावर बँकेची वाताहत झाली. नंतरच्या वार्षिक सभेत किसन आणि त्याच्या पाठिराख्यांनी गोंधळ घालून सभाच बंद पाडली व तुमच्या बद्दलचे प्रश्न विचारू दिले नाही. बँक प्रशासकाच्या ताब्यात जाऊन आता तीन वर्षे झाली. वसुली थोडीफार झाली पण आता बँक चालविण्यात कोणालाच स्वारस्य नाही”.

“इथपर्यंतचा इतिहास तर मला माहिती आहे पण माझ्या विरूद्ध कोणी कट रचला हे मला अजुन कळले नाही”.

“म्हणजे तुम्हाला शर्मा आणि किसन यांनी पद्धतशीरपणे जाळ्यात अडकवले हे तुम्हाला माहिती नाही? तुमच्या कार्यपद्धतीमुळे त्यांना गडबड करता येईना व लोकप्रियतेमुळे तुम्ही डोईजड होणार हे त्यांनी ओळखले होते”.

“या सर्व सांगोवांगीच्या गोष्टी आहेत. ”

“मी स्वतः त्यांचे बोलणे ऐकले आहे. मी नवीनच जॉईन झालो होतो. याला काय कळते असे समजून किंवा माझा तुमच्याशी कधी संपर्क होणार नाही असे समजून बेसावधपणे माझ्यासमोर ते बरेचदा बोलत असत. तुम्हाला शिक्षा झाल्यावर किसनने जोरदार पार्टी दिली होती”.

खरे म्हणजे शामचा शब्दच माझ्याकरता पुरेसा होता म्हणून कसेबसे स्वतःला सावरुन मी विचारले "अरे ते जाऊ दे. मला सांग ते आता काय करत आहेत?".

"शर्मानी स्वतःची हिंद फायनान्स म्हणून कंपनी काढली आहे. अर्थात प्रमुख धंदा किसनला पतपुरवठा पठाणी व्याजावर करणे तेही ठेवीदारांच्या पैशावर असा आहे. सर्व माहिती असूनही त्यांना बकरे मिळतात हे विशेष. किसन बनचूक्या बिल्डर झाला आहे. आतापर्यंत एक ही स्कीम धड पूर्ण केली नाही. आता राजकारणात घुसायला बघतो आहे".

"का बरे?"

"कायद्यापासून वाचायला. किती विचित्र सिस्टीम आहे. ज्यांनी त्याला आत केले पाहिजे तोच त्याला संरक्षण देत आहे. अरे हो, या संदर्भात अजून एक वाईट बातमी आहे. माफ करा सर, तुम्हाला मी मघापासून वाईट बातम्याच सांगत आहे".

"काही हरकत नाही. सांग काय असेल ते".

"तुमच्या चाळीचे रिनोव्हेशन या किसनने करायला घेतले होते".

"मग?"

"आता तो त्यांना ताबा देत नाही आहे. मी तर ऐकून आहे की तो इतरांना विकायच्या खटपटीत आहे. काहीतरी किरकोळ कायदे दाखवून"

"आणि चाळकरी गप्प आहेत?"

"ते काय करतील, त्यांचे हात दगडाखाली आहेत".

बातमी खरंच वाईट होती. मी शामला कोणाचे नंबर आहेत का असे विचारले. त्याने चार नंबर दिले.

आता अजून विचारण्यास काही बाकी नव्हते. मी शेवटी माझ्या मनात असलेला प्रश्न शामला विचारला "शाम तू मला कसे काय ओळखले?"

क्षणभर विचार करून तो म्हणाला "खरे तर ओळखले नव्हते पण तुम्ही सवईने उजवा हात केसांवरून फिरवताच खात्री पटली".

अडचणीत आणणारी सवय. मोडायला हवी मी मनाशी नोंद केली.

बरे तर निघुया असे म्हणून मी उठताच "असू द्या सर माझा एवढा तरी अधिकार आहेच" असे म्हणत बळेबळेच माझ्या हाती एक पाकीट कोंबले.

अच्छा, या करिता हा जेवणाआधी पांच मिनिटात येतो म्हणून पळाला होता असे मनाशी म्हणत मी त्याचा निरोप घेतला. ताईने दिलेले व हे पाकीट मी अॅटॅचीत ठेवण्याऐवजी मी खिशातच ठेवले कारण सर्व पैसे एका जागी ठेवू नये ही आमच्या चाळीतली शिकवण. अॅटॅचीत फक्त तुरुंगातील मोबदला आता शांतपणे घरी जाऊन आराम करावा आणि नंतर काय करायचे ते बघू असा विचार करून मी बाजूच्या बसस्टॉपवर थांबलो. सर्व बसेस भरून येत होत्या आणि गर्दीत घुसण्याची माझी सवय मोडली होती. माझी चलबिचल एक तरुण बघत होता. एक बस येताच त्याने मला अक्षरशः मागून रेटा दिला व मी कसाबसा बसचा दांडा आधाराला धरताच माझ्या हातातील अॅटॅची हीसका मारून ओढली व पळ काढला. मी लगेच बस सोडून त्याच्या मागे चोर चोर असे ओरडत पळू लागलो. तो अर्थात् माझ्या

बऱ्याच पुढे होता पण जसजसे आमच्यातले अंतर कमी होऊ लागले तसा तो गोंधळून वेडावाकडा धावू लागला. तो चौकातील सिग्नलपाशी पोचल्याचे मला दुरून दिसत होते तसा मी अजून वेग वाढवला. मी जवळ येत असल्याचे बघताच तो मुसंडी मारून चौकातून पळू लागला. त्याच्या दुर्दैवाने त्याचवेळी सिग्नल हिरवा झाला आणि तो सरळ एका वेग पकडलेल्या ट्रक खाली आला. मला हे सर्व दुरून दिसत होते. मी तिथे पोचेपर्यंत त्याचा खेळ खलास झाला होता व सभोवताली गर्दी जमली होती. तेथील वाहतूक पोलीस पण तिथे पोचला होता. त्याच्या सराईत नजरेने आता उगाच धावपळ करण्यात अर्थ नाही हे केव्हाच ओळखले होते. तो शांतपणे अ‍ॅटॅची उघडून कागदपत्रे बघत होता. “नरेन जोशी, कोणी ओळखता काय?” त्याने गर्दीकडे बघत विचारले.

मी अगदी पुढे होऊन त्याच्याशी बोलणार तेवढ्यात माझ्या मनात एक विचार आला. या नावाचा तसाही मला जाच होणार होता. का बरे याचा फायदा घेवून मी दुसऱ्या नावाने वावरू नये? तसेही माझ्या आयुष्यातले दुसरे पर्व सुरू होणारच होते, ते नवीन नावाने का करू नये? झाले, मी जेवढ्या वेगाने पुढे सरसावला होतो तेवढ्याच वेगाने बाहेर आलो.

---

नवे नाव

गर्दीतून बाहेर येताच मी कपाळावरील घाम टिपला. इकडेतिकडे बघितले तर जवळ एक सुपर मार्केट दिसले. फारसा विचार न करता मी आत घुसलो. थोडे रमतगमत फिरून डोक्याचा शिण घालवणे एवढाच माझा उद्देश होता. असेच निवांतपणे विंडो शॉपिंग करत मी दुसऱ्या मजल्यावर पोचलो. तिथे मेन्स पार्लर ऑल अंडर वन रुफ अशी पाटी दिसली. बाहेरचं सर्व्हिस आणि रेट्स पण लिहिले होते. मी कुतुहलाने ते वाचू लागलो. फेस मसाज, बॉडी मसाज, स्टीम बाथ असे विविध प्रकार वाचत असता सर, मे आय हेल्प यू? असा मागुन आवाज आला. मी चपापून मागे वळून बघितले तर एक विशीतला विक्रेता मला दिसला. काही नाही असे वरमून पुटपुटत मी जाऊ लागलो तोच त्याने परत आर्जवाने तोच प्रश्न विचारला. त्यावेळी वर्दळ नसल्याने कदाचित तो जास्त लक्ष देत असेल पण त्याच्या बोलण्यात जे आर्जव होते त्यामुळे माझ्या मनात एक कल्पना आली. मी विचार केला 'नाव आपण नवीन घेतोच आहे तर नवीन रंगरूप पण का घेवू नये" उघडपणे मात्र मी तसे दाखवले नाही.

"कदाचित तुम्ही मला मदत करू शकाल?असे म्हणालो.

"जरुर सर, तुम्ही सांगा तर. माझे नाव अभिषेक. मी अगदी एक्स्पर्ट आहे यात. परफ़ेक्ट आर्टिस्ट कडून काम करून घेईन".

“हे बघा, अजून एका तासानी म्हणजे साडेचार वाजता माझी मैत्रीण मला भेटायला इथेच येणार आहे”.

“मग?”

“मी हा असा गबाळा राहतो हे तिला अजिबात आवडत नाही” मी स्वतःकडे बोट दाखवित म्हणालो.

“मी समजू शकतो”

“तर तुम्ही एका तासात माझा अवतार असा टीप टॉप करा की तिने मला ओळखले नाही पाहिजे”.

त्याच्या तोंडून नकळत शिट्टी वाजली.

“सर, हे जरा जास्तच होत आहे असे तुम्हाला वाटत नाही काय?”

“A friend in need..... ”.

“पुरे, पुरे, पण माझी एक अट आहेत”

“काय?”

“सर्व चॉइस माझा राहील ”

“कबुल, पण बदल झाला हे कसे ठरवणार?”

“आपण आधी व नंतर असे फोटो काढू”.

“नाही, मला थर्ड पर्सन ओपिनियन पाहिजे”.

“अरे देवा, You are a tough customer. पण ठीक आहे. तुम्ही तुमच्या सर्व वस्तू त्या आत काऊंटरवर बसलेल्या मुलीकडे द्या. ती तुम्हाला एक टोकन देईल. एका तासानी तुम्ही परत वस्तू परत घ्यायला याल तेव्हा टोकन हरविले म्हणून सांगा. ”

“त्याने काय होईल?”

“जर तिने तुम्हाला एका तासापूर्वी आलेला माणूस हाच म्हणून ओळखले तर मी हारलो”.

“पण तुम्ही तिला संपर्क करायचा नाही”.

“नाही करणार”

ठीक आहे असे म्हणून मी माझ्याकडे असलेल्या सर्व वस्तू त्या काऊंटर वरील मुलीकडे दिल्या. तिने त्या व्यवस्थित एका बॅगमधे देवून सील केल्या. एक टोकन देत तिने मला ते हरवू नका, त्याशिवाय वस्तू मिळणार नाही असे बजावले.

मी परत त्या अभिषेककडे आल्यावर अजिबात वेळ न गमावता प्रथम माझा मोबाईलवर एक फोटो काढून मला दाखवला. फोटो बघताच मी दचकलो. मी अगदीच काही कागद गोळा करणारा वाटत नव्हतो पण फारसा नीटनेटका पण दिसत नव्हतो. अभिषेकच्या दृष्टीने हा नक्कीच टफ जॉब होता. माझ्या रेकॉर्ड करिता असे म्हणत तो मला सलूनमधे घेऊन गेला. तेथील कारागीर येताच त्याने त्याला माझे केस कसे कापायचे व दाढी कशी ट्रिम करायची याच्या बारीक सूचना दिल्या. दाढी राहणार हे ऐकून मला बरे वाटले. तुम्हाला शोभून दिसते हे त्याचे

वाक्य नाही म्हटले तरी सुखावणारे होते. त्यानंतर त्याने मला मसाज, स्टीम बाथ असे फिरवले. ते होत नाही तर लगेच कपडे, बूट तयार होतेच. टाय, कोट त्यानेच बाद केले. यापुढे शर्ट इन करणे, बेल्ट कम्पल्सरी वगैरे उपसूचना आल्या. सगळा जामानिमा झाल्यावर त्याने माझ्या सभोवती एक दोन राऊंड मारले. त्याच्या चेहऱ्यावर जरा असमाधान दिसत होते. Something is missing असे पुटपुटत तो बाहेर गेला व एका विक्रेतीला घेवून आला. ती त्याची मैत्रीण असावी. तिने पण माझ्या सभोवती एक दोन राऊंड मारले. मग दोघेही वेगवेगळ्या कोपऱ्यात जाऊन माझ्याकडे निरखून बघू लागले. Yes you are right. Something is missing अशी तिने पुष्टी दिली. तेवढ्यात got it म्हणत अभिषेक बाहेर गेला व बारीक सोनेरी काड्या असलेला चष्मा घेवून आला आणि त्यानी तो समारंभपूर्वक मला घातला.

Wow म्हणत त्यांनी एकमेकांना टाळ्या दिल्या. तिने एका आठफुटी आरश्यावरील पडदा दूर केला व त्यात मला बघण्यास सांगितले. मी आरश्याकडे जावू लागताच सर मिनिट म्हणत अभिषेकने माझे खांदे थोडेसे आत दाबले आणि मला श्वास आत ओढून चालावयास लावले. हे तुमचे खरे पोश्चर आहे असे तो म्हणाला. मी त्याप्रमाणे चालत गेलो व आरश्यात बघितले. माझा माझ्या डोळ्यावर विश्वास बसेना. खरंच आमूलाग्र बदल वाटत होता.

“Superb” मी म्हणालो “पण अजून एक परीक्षा बाकी आहे”

मी तसाच बाहेर काउंटरवर गेलो. तेथील मुलीने अनोळखी नजरेने माझ्याकडे बघितले.

“माझ्या वस्तू परत घ्यायला आलो”

“टोकन?” तिने हात पुढे केला.

“एका तासापूर्वी मी आलो होतो. पण टोकन हरवले आहे”.

“सॉरी सर, पण तुम्हाला बघितल्याचे मला आठवत नाही”.

मागुन अभिषेक व त्याची मैत्रीण बघत असतील याची मला कल्पना होती. मी मागे बघून थंबस अप केले. ते दोघेही धावत आले. अभिषेक टोकन तिला देत म्हणाला हे सर आत विसरले होते. मी वस्तू चेक करेपर्यंत त्याने बिल केले होते. नाव काय लिहू असे त्याने विचारले.

“विवेक पंडित” मी शांतपणे म्हणालो.

---

राजासाब

विशेष वेळ न घालवता मी एक्झिट गेटकडे गेलो. जाणारे लोक तसे कमी होते. माझ्या समोर एक सुटाबुटातले वयस्कर गृहस्थ होते. ते बरेच प्रसिध्द आणि लोकप्रिय असावेत कारण जवळपास प्रत्येकजण त्यांना अभिवादन करीत होते आणि ते पण हसून प्रतिसाद देत प्रत्येकाची नावानिशी विचारपूस करीत होते. एक्झिट गेटच्या बाहेर येताच तेथील मुलीने त्यांना नमस्कार केला आणि काऊंटर खाली वाकून ती काही काढू लागली. तिकडे लक्ष न देता ते पार्किंगकडे गेले पण. एव्हाना मी तिच्यापाशी पोचलो होतो. मी तिथे पोचताच तिने एक अॅटॅची काढून काउंटरवर ठेवली आणि हे घ्या राजासाहेब असे म्हणाली. पण मला समोर बघताच दचकली. राजासाहेब? असे तिने विचारताच मी बाहेर बोट दाखविले. अरे देवा ही त्यांनी मला जपून ठेव मी जातांना नेईन असे म्हणाले होते आणि आता स्वतः च विसरले वाटते असे म्हणत बाजूच्या कुबड्या घेवून उठू लागली. तेव्हा ती अपंग आहे हे माझ्या लक्षात आले. साहजिकच तुमची हरकत नसेल तर मी नेऊन देतो असे म्हणालो. त्यावर तिने माझ्याकडे एक दृष्टीक्षेप टाकला आणि अभिषेकचे विशेष आभार, फार उपकार होतील असे मला अॅटॅची देत ती म्हणाली.

मी पार्किंग लॉटकडे धावतच गेलो पण मला थोडा उशीर झाला होता. राजासाब त्यांच्या मर्सिडीजमधे बसून गेटबाहेर जातांना मला दिसले. त्यांच्या कारचा काळा रंग व नंबर प्लेट वरील ४५ हा नंबर मी निसटता पाहू शकलो. ते

जात असता गेटमनशी काही बोलले होते हे पण मला दिसले होते म्हणून मी त्याला राजासाब कुठे भेटतील असे विचारले. “गिरिराज नगर “तो शांतपणे म्हणाला. मी पूर्ण पत्ता विचारला. तो ही त्याने आनंदाने सांगितला व कसे जायचे हे पण सांगितले.

एकंदरीत राजासाब बरेच लोकप्रिय होते. पूर्ण पत्ता होता राजशेखर राजोपाध्ये राजतरंग गिरिराज नगर. येथे पोचायला मात्र मला आठ वाजले कारण संध्याकाळ झाल्यामुळे वाहतूक खुपच वाढली होती. त्यामुळे बऱ्याच ठीकाणी कोंडी झाली होती. एकंदरीत सहराणपुर फारच वाढले होते. पत्ता शोधण्यास मला विशेष श्रम पडले नाहीत. बंगला अवाढव्य होता. गेटवर वॉचमनची केबिन होती पण तो जागेवर नव्हता आणि कुत्र्यापासून सावध रहा अशी पाटी कुठेही न दिसल्याने मी सरळ आत गेलो. तिथे मला पोर्च जवळील खिडकीतून आत डोकावित असलेला वॉचमन दिसला. मी हळूच त्याच्या मागे जाऊन त्याच्या खांद्यावर थापट मारताच तो दचकला. मागे वळुन त्याने तुम कौंन अंदर कैसा आया असे विचारले. त्यावर गेटसे आया और साब को मिलनेका एवढेच मी बोललो. त्यावर तो अजूनच घाबरला आणि अभी नही, कल आव असे त्याने बजावून मला जाण्याची खूण केली. एव्हाना मी या प्रश्नोत्तराला कंटाळलो होतो. हे बघ त्यांना त्यांची वस्तू द्यायला मी आलो आहे एवढेच सांग असे मी ओरडून सांगताच तो कुरकुरत आत गेला. दोनच मिनिटात तो पळत बाहेर आला आणि मला चलो साब बुलाया है म्हणत आत घेवून गेला. दिवाणखान्यात पोचताच राजासाब तीनचार नोकरांची खरडपट्टी काढीत असल्याचे दिसले. बहुधा हीच गंमत वॉचमन बाहेरून बघत असावा. मला बघताच राजासाब म्हणाले” आपण?”

“मी विवेक पंडित, ही अँटॅची द्यायला आलो आहे” असे म्हणत मी अँटॅची त्यांच्याकडे दिली.

“आपण आधी भेटलो आहोत?”

“नाही”

“मग ही तुमच्याकडे कशी आली”.

त्यावर मी मार्केटपासून इथपर्यंतचा प्रवास सांगितला.

“ही अँटॅची परत करण्यासाठी तुम्ही इथवर आला?”

“होय, आपली वस्तू हरवली तर माणूस किती अस्वस्थ होतो याची मला कल्पना आहे” मी नोकरांकडे बघत म्हणालो.

यावर ते जोरात हसून बरोबर आहे असे म्हणाले. त्यावर मी त्यांना अँटॅची तपासण्याची विनंती केली. त्यांनी तपासून सर्व बरोबर आहे असे सांगताच मी त्यांना नमस्कार करून आता मी निघतो असे म्हणालो. तेव्हा मी उभाच आहे हे तेव्हा त्यांच्या लक्षात आले. गडबडून ते माझ्याजवळ आले. माझे दोन्ही हात हातात घेवून म्हणाले.

“सॉरी, सॉरी मी तुम्हाला बसा पण म्हणालो नाही. खरंच तुम्ही किती मोठे काम केले आहे तुम्हाला कल्पना नाही. तुम्हाला एकदा पण अँटॅची उघडून त्यात काय आहे हे बघावेसे वाटले नाही?”

“नाही”मी म्हणालो.

“आश्यर्य आहे. तुम्ही आता जेवल्याशिवाय जायचे नाही तोवर जरा फ्रेश व्हा “मला हो नाही म्हणायची संधी पण न देता म्हणाले “अरे रघु, विवेकचे पण पान घे”.

राजासाब तसेही कोणाला बोलू देत नसत हे जेवतांना माझ्या लक्षात आले. नोकरांना या आतिषबाजीची सवय असावी. ते आपले गालातल्या गालात हसत काम करीत होती. जेवतांना त्यांनी स्वतःची सर्व माहिती दिली. मुंबई, पुणे आणि नाशीक याठिकाणी बांधकाम व्यवसाय, सहराणपुरला हेड ऑफिस. इथला कारभार ते बघतात, बाकीचा त्यांचा मुलगा व सून. तो येवून जावून असतो पण सर्व त्यांनाच बघावे लागते. वगैरे वगैरे. जेवण होईपर्यंत मला राजोपाध्ये फॅमिलीची पूर्ण माहिती झाली.

जेवणानंतर मी काही बोलायच्या आत ते स्वतःहूनच म्हणाले की आता इतक्या रात्री कुठे जाऊ नकोस. सकाळी जा. माझ्या सम्मतीचा प्रश्न नव्हताच. मग त्यांनी मला चल जरा लॉनवर बसून गप्पा मारू असे सुचविले. आम्ही बाहेर बसताच थोडा वेळ शांततेत गेल्यावर त्यांनी सुरवात केली

“मी मघापासून एकटाच बोलतोय. मी तुझी काहीच माहिती विचारली नाही. कोण तू, काय करतो, कुठला आहेस, कुठे जाणार आहेस?”

मी खिन्नपणे हसून म्हणालो “काय करणार आहात हे ऐकून राजासाब. मी स्वतःच सर्व विसरायचा प्रयत्न करतोय. एक अनामिक भेटला आणि निघून गेला इतकेच स्मरणात असू द्या ”.

“बराच दुखावलेला दिसतोस. अरे काही हातचे न राखता सांग. कुणास ठावूक माझ्या साठ वर्षांच्या अनुभवाने मी काही नवीन मार्ग सुचवू शकेन”.

यांच्याशी युक्तीवाद अशक्य आहे असे मनात म्हणत मी माझी पूर्ण कर्म कहाणी काही न लपवता त्यांना सांगीतली. त्यांनी शांतपणे मध्ये कोणताही प्रश्न न विचारता सर्व ऐकले. माझे बोलणे संपल्यावर दोन मिनिटे निशब्द शांततेत गेली. नंतर ते हळूच आकाशाकडे हात करून मला म्हणाले “मला वाटत होते की त्यानी तुझ्यासारखी माणसे बनविणे बंद केले असेल”.

मी काहीच बोललो नाही. त्यांना पण उत्तराची अपेक्षा नसावी. आणखी काही क्षण शांततेत गेल्यावर त्यांनी विचारले “आता पुढे काय करायचे ठरविले आहे?”

“एखाद्या मोठ्या शहरी जाऊन उद्योग धंदा करीन म्हणतो”.

“आणि फ्रेनीचे काय?”

“तिचे काय? उद्याच्या पेपरमधे माझ्या मृत्यूची बातमी वाचून काही दिवस ती रडेल, नंतर सावरेल, कोणाशी तरी लग्न करून संसार थाटेल. काळ कोणाकरताही थांबत नाही”.

“मलातरी ती तशी मुलगी वाटत नाही आणि तुझे काय? तू विसरु शकशील फ्रेनीला?”

“नाही, तिची जागा कोणी घेऊ शकत नाही”.

परत क्षणभर थांबून त्यांनी विचारले “शर्मा आणि किसन यांचा सूड घ्यावा असे तुला वाटत नाही?”

“वाटते ना. कालपर्यंत मी सूड घेण्यासाठी तडफडत होतो”.

“आणि आज?”

“आज बाहेर आल्यावर मला माझ्या मर्यादा कळल्या आहेत. सात वर्षात ते इतके धनदांडगे आणि मस्तवाल झाले आहेत की त्यांच्यापुढे माझे काही चालणार नाही हे मला समजून चुकले आहे”.

“थोडक्यात म्हणजे त्यांना शिक्षा करण्यापेक्षा आपण त्यांच्या मार्गातून दूर व्हावे. असेच ना?”

“तुमचा उपरोध मला कळू शकतो राजासाब. पण त्यांच्या विरूद्ध लढायला मला पैसा लागेल. कोण देणार मला तो? कोण ठेवील एका सजा भोगून आलेल्या माणसावर विश्वास?”

“मी ठेवीन. माझा विश्वास आहे तुझ्या प्रामाणिकपणावर आणि कर्तृत्वावर”.

मी अविश्र्वासाने त्याच्याकडे पाहिले.

“तुम्ही हे सर्व का कराल?”

“हे बघ प्रश्न टाळून सुटत नसतो. त्याला सामोरे जाण्यातच पुरुषार्थ आहे. मला वाटते तुझ्या आईने तुला हेच शिकविले आहे”.

“मी तयार आहे” मी क्षणात उत्तरलो.

“तर मग नीट लक्ष देऊन ऐक. सहराणपुरला माझे हेड ऑफिस आहे हे मी तुला सांगितले आहे. तिथेच तू फायनान्स हेड म्हणून जॉईन हो. तिथे इनव्हेस्टमेंट शाखा पण आहे तिचा विस्तार करणे व सूर्या बिल्डरला पतपुरवठा करणे ही तुझी जबाबदारी. या करिता लागेल ते मनुष्यबळ, पैसा तू माझ्या परवानगीने तू वापरू शकतोस. याच्या पडद्यामागे तू तुझे मुख्य काम चालू ठेव”.

“तिथे किती लोक काम करतात?”

“तीस. राकेश देशमुख हा तेथील व्यवस्थापक आहे. तो तुला रिपोर्ट करेल”.

“नाव ऐकल्यासारखे वाटते”.

“असू शकते कारण तो सेंट पेटिटला होता”.

“कदाचित तो मला ओळखेल”.

“त्यानिमित्ताने कळेल तरी तुझ्यातला बदल कितपत परिणामकारक आहे. तुझ्या दृष्टीने तो फार उपयोगी माणूस आहे कारण त्याच्या भरपूर ओळखी आहेत. आता जास्त शंका कुशंका काढीत बसू नको. उद्या आठ वाजता तुला राजाराम ऑफिसला पोचवेल. Goodnight & goodluck”.

---

## सूर्या बिल्डर्स

दुसऱ्या दिवशी मी सकाळी बरोबर आठ वाजता सूर्या बिल्डर्स च्या हेड ऑफिसला पोचलो. ऑफिस तीन मजली आणि चांगले प्रशस्त होते. गाडी थांबताच राकेशने स्वागत केले. त्याला राजासाहेबांनी फोन करून मी येत असल्याचे सांगितले होते. त्याने सर्वप्रथम ऑफिस दाखविले. पहिल्या मजल्यावर फायनान्स, दुसऱ्यावर इनव्हेस्टमेंट व तिसऱ्यावर सर्व्हिस फ्लॅट अशी विभागणी होती. माझी सोय सर्व्हिस फ्लॅटमध्ये करण्यात आली होती. राकेशने मला ओळखले नाही आणि मला वाटणारी धास्ती कमी झाली. राकेश जरा गबदुल झाला होता पण बडबड करायची सवय कायम होती. मला फ्लॅट दाखवितांना तो म्हणाला "मिसेस पंडित मागाहून येणार आहे आहेत काय? सामान पण येणार असेल "

"कोणी मिसेस पंडित नाही त्यामुळे कोणतेही सामानपण नाही"

"म्हणजे?"

"माझे लग्न झाले नाही".

"योग्य केले सर, माणसाने लग्न करूच नये या मताचा मी आहे. मी पण अजून केले नाही".

"राकेश, मी तुझे मत विचारले नाही" मी उगीच डाफरलो. त्याचे वैषम्य वाटू न देता त्याचा पुढचा प्रश्न आलाच.

"सर तुम्ही किती वाजता ऑफिसला येणार?"

“दहा मिनटात फ्रेश होऊन आलोच”.

“ठीक आहे. मी कॉन्फरन्स रूममधे सर्वांना बोलवतो”.

“कशाला?”

“ओळख करून द्यायला”

मी जास्त न ताणता त्याला होकार दिला.

ओळख समारंभ संपताच त्याने मला माझी केबिन दाखविली. बाजूलाच त्याची केबिन होती. मधे काचेचे पार्टीशन होते. फोन, कॉम्प्युटर वगैरे समजून दिल्यावर आलोच म्हणून तो गायब झाला. मी केबिन निरखून बघितली. तशी साधी होती पण नेटकी होती. तोपर्यंत मी खिशातले कागद टेबलवर काढून ठेवले व एक एक करून बघू लागलो. तेवढ्यात राकेश परत आला.

“सर तुमचा फोन चेक करा. पॅरलल फोन फ्लॅटमधे आहे”.

मी त्याला बसायची खूण केली.

“मी काही मदत करू काय?”तो बसत म्हणाला.

“बरीच” मी कागद बाजुला करीत म्हणालो “मला एक वकील पाहिजे. इस्टेट आणि प्रॉपर्टीवाला”

“अनुभवी?नवशिका चालेल?”

“चालेल पण खमका पाहिजे”.

“खमकी आहे. ती साडेतीनला भेटेल”.

याच्यावर राजा साब का एवढा विश्वास ठेवतात हे मला आता कळू लागले होते.

ठीक आहे असे म्हणून तो गेला व मी फोन चेक करू लागलो. तेवढ्यात राकेश एक लेडीज वकील घेऊन आला.

“सर या सुचेता पाठक. आपल्या वकील”.

“मी तिला बसण्यास सांगितले. राकेशला पण बसण्यास सांगितले.

“राकेशनी काही कामाची कल्पना दिली आहे काय?”

“नाही”

“ठीक आहे. मी सांगतो पण मी जे सांगणार आहे किंवा करणार आहे ते तुम्हाला कायद्याच्या चौकटीत बसवायचे आहे. त्यामुळे असे कायद्याने आपण करू शकत नाही हे मला सांगू नका. अर्थात् काम स्वीकारायचे की नाही हे तुम्ही ठरवू शकता”.

“ठीक आहे आणि एकेरीत बोललात तर चालेल”.

“तुम्ही दोघेही मला एकेरितच संबोधू शकता. तर किसन गोरडेनी एक रिनोव्हेशन जवळपास पूर्ण केले आहे पण आता त्यात तो काही अडचणी निर्माण करत आहे. ”

“मी ऐकून आहे”.

“ताबा घेणारे सर्व चाळकरी आहेत. आधीच त्यांच्या सेवा बँकेतील ठेवी बुडाल्याने ते वैतागले आहेत. आता त्यात ताबा मिळत नसल्याने ते हवालदिल झाले आहेत. मी असे ही ऐकले आहे की किसन त्यांना डीफॉल्टर म्हणून दाखवायच्या खटपटीत आहे. असे झाले तर फ्लॅट पण गेल्यात जमा आहे”.

“ते कोर्टात ठरेल”.

“तोवर चाळकरी मरतील त्याचे काय?”

“तू काय करायचे ठरविले आहे?” सुचेता अस्वस्थ होऊन म्हणाली.

“गुढी पाडव्याला सर्वांनी फ्लॅटचा ताबा घ्यायचा”.

“तो कसा?”

“पुजेकरता किल्ल्या मागायच्या. दिल्या तर ठीकच नाही दिल्या तर कुलुपे तोडून ताबा घ्यायचा”.

दोन मिनिटे कोणीच बोलले नाही. नंतर हळूच राकेशने विचारले “किसनला कळल्यावर तो त्रास देईल, हुसकावून लावेल”.

“त्यांच्या स्वतःच्या घरातून? आणि तो धमक्या, त्रास देईल तर आपण पण उत्तर देवू. कायदेशीर बाबी सुचेता बघेल. काय सुचेता तुला काय वाटते?”

“मला वाटते हे सर्व चाळीतल्या लोकांच्या एकजुटीवर अवलंबून आहे. प्रथम त्यांच्याशी बोलले पाहिजे”.

“पण तू तयार आहे काय?”

“जर ते तयार असतील तर मी तयार आहे”.

“आणखी एक महत्वाची गोष्ट. या प्रकरणात कोठेही सूर्या बिल्डर्सचे नाव यायला नको”.

सुचेता जरा विचारात पडली. “चाळीतील लोकांशी बोलतांना सुरवातीला तरी तुमची आवश्यकता आहे”.

मी भिडे काकांचा नंबर तिला दिला. ” यांना रात्री आठ वाजता हॉटेल नैवेद्यला जेवायला बोला. सोबत परब, थोरात आणि जानकर यांना पण घेवून येण्यास सांग”.

“आजच?”

“हो, आपल्याकडे वेळ कमी आहे आणि राकेश हे प्रकरण संपेपर्यंत सुचेताच्या सुरक्षेची पूर्ण जबाबदारी तुझी”.

राकेश एका पायावर तयार होता.

रात्री आठ वाजता नैवेद्य हॉटेल मध्ये सर्व जण जमताच आणि ओळख करून घेणे संपताच सुचेताने विशेष वेळ वाया ना घालवता योजना मांडली. हे चारजण जे ठरवतील ते चाळ विनातक्रार ऐकते हा माझा अनुभव होता. पण त्यांच्या ही शंका, अडचणी असू शकतील हे गृहीत धरून योजना करायची होती. सगळे ऐकल्यावर मी भिडेकाकांना मत विचारले.

“खरे तर असे करावे हे चाळीतल्या तरुण मुलांचे बरेच दिवसांचे म्हणणे आहे. मीच आपला त्यांना रोखून धरत होतो.”

“शिवाय पोलीस, मारामारी वगैरे शक्यता यातपण आहेच” परब म्हणाले.

“आपण हाच विचार करून गप्प बसू, फारतर कोर्टात जाऊ हे किसन जाणून आहे म्हणूनच त्याचे फावले आहे”. मी उत्तरलो.

“साहेब तुम्ही निवांत दुरून गंमत बघाल हो, आमची मुले मार खातील त्याचे काय, तुम्ही येणार काय त्यांना सोडवायला?” जानकर म्हणाले.

“नाही येणार “मी ठामपणे म्हणालो “तुमची लढाई दुसऱ्याने लढावी ही अपेक्षा तुम्ही का करता?”

“ही अपरोक्ष मदत तुम्ही तरी का करता?” भिडे काका अनपेक्षितपणे म्हणाले.

याच प्रश्नाला काय उत्तर द्यावे याचा विचार करून माझे डोके दुखायला लागले होते. शेवटी मी शांतपणे म्हणालो “काका मी तुमच्यातलाच एक आहे. आपल्या कष्टाच्या कमाईवर कोणी डल्ला मारला तर काय अवस्था होते याची मला कल्पना आहे. यात व्यवसायिक स्पर्धा आहेच. ती मी नाकारत नाही पण तुमच्या दृष्टीने ही एक चांगली संधी आहे. ही जर तुम्ही घालवली तर तुम्हाला कोर्ट कचेऱ्या करणे एवढाच पर्याय राहील. याउपर तुमची मर्जी “.

यावर सगळेच गप्प झाले. शेवटी भिडे म्हणाले “आम्ही उद्या दुपारी दोनपर्यंत आमचा निर्णय सुचेताला कळवतो”.

राकेश आणि सुचेताला त्यांच्या घरी सोडून मी परतलो. त्या रात्री मला झोप आली नाही.

पहिला वार

दुसऱ्या दिवशी दोन वाजून गेले तरी सुचेताचा फ़ोन आला नाही. प्रकरण बारगळलेले दिसते असे मनाशी म्हणून मी मेल बघू लागलो तेवढ्यात सुचेताचा फोन आला.

“विवेक, चांगली बातमी आहे. चाळकरी तयार आहेत. तू पाच वाजता माझ्या ऑफिसला येवू शकतोस काय? प्लॅन फायनल करू”.

“येईन” मी कसाबसा आनंद लपवीत म्हणालो.

ठीक पाच वाजता मी राकेश बरोबर सुचेताच्या ऑफिस मध्ये पोचलो. भिडे व इतर तिघे आधीच आले होते. सुचेताने कागदपत्रे तपासली होती. आम्ही पोचताच हे काम कसे करायचे अशी विचारणा त्यांनी केली.

“सर्वप्रथम भिडे काका गुढी पाडव्याच्या आदल्या दिवशी जावून सर्व फ्लॅटच्या किल्ल्या पूजा करायची आहे असे सांगून आणतील. काय काका जमेल काय?”.

“जमेल, पूजा झाल्यावर परत करू असे सांगितल्यावर तो देईल”भिडे आत्मविश्वासाने म्हणाले.

“निम्मे काम इथेच झाले. दुसऱ्या दिवशी सकाळी गरजेपुरते सामान घेऊन सरळ ताबा घ्यायचा. तेथील वॉचमनने जरी कळवले तरी फरक पडत नाही कारण त्या दिवशी दोन भूमिपूजन समारंभ शहराच्या दुसऱ्या टोकाला आहेत. त्यातून त्याने

कितीही घाई केली तरी चार पाच तास त्याला निघायला लागतील. तोपर्यंत तुमचा गृहप्रवेश पूर्ण झाला पाहिजे. तुमच्या टीव्ही डिश, कपडे वाळत घालायच्या दोऱ्या, कॉमन प्लेसवर कुंड्या, लेटर बॉक्स तयार दिसल्या पाहिजेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सोसायटी च्या नावाचा बोर्ड प्रवेशद्वारावर दिसला पाहिजे".

मी इतका बारकाईने विचार केला असेल असे कोणालाही वाटले नव्हते त्यामुळे परब आश्चर्याने म्हणाले "एवढे करावे लागेल असे आम्हाला वाटले नव्हते".

"मी यासाठीच घाई करत होतो. हे सर्व आपली केस मजबूत करण्यासाठी आवश्यक आहे. याशिवाय तीन शक्यता गृहीत धरून आपल्याला तीन प्लॅन करावे लागतील".

"ते कोणते?"

"प्लॅन ए : कळल्याबरोबर किसन येईल, दमदाटी करेल तुम्ही ऐकत नाही असे दिल्यावर पोलीस तक्रार करेल. पोलीस चौकशीसाठी येतील. सुचेताने आधीच कागदपत्रे दाखवीली असणार. सर्व फॅमिली मजेत राहताना दिसल्यामुळे पोलीस तक्रार पण घेणार नाही. आपसात मिटवा असा सल्ला देऊन निघुन जातील. किसन दोन तीन महिने दमदाटी करेल. एकजूट बघितल्यावर गप्प बसेल

प्लॅन बी: किसन त्याचे गुंड आणून हुसकवण्याचा प्रयत्न करेल. इथे चाळीतले तरुण समोर येतील. त्याच वेळी काही तरुण किसनच्या बंगल्यावर पोचले असतील. ते तिथून तसे फोटो किंवा व्हिडिओ पाठवतील. इथे राकेशचे कॉन्टॅक्ट आपल्या कामी येतील. असे काही झाल्यास तो सरळ टीव्ही चॅनेलची टीम तिथे पाठवेल".

“नो प्रॉब्लेम” इती राकेश.

“प्लॅन सी: किसन कोर्टात धाव घेईल. तसे केले तर काय करायचे हे सुचेता ठरवेल. पण तो तसे काही करणार नाही कारण ते त्याच्यावरच उलटेल”.

“तुम्हाला काय वाटते तो काय करेल?”भिडे

“प्लॅन ए, कारण त्याला अशा पद्धतीने कोणीच आव्हान दिले नाही. शिवाय आपण एव्हढी तयारी केली असेल असे त्याला स्वप्नात पण वाटणार नाही. फक्त संपूर्ण गुप्तता पाळा. त्याला विचार करायला वेळ देऊ नका. मग आहे का सगळे तयार?”.

सगळे ऐका सुरात हो म्हणाले. तोच धागा पकडुन मी पुढे म्हणालो “काही सूचना आणि नियम पाळणे जरुरी आहे. ताबा घेतल्यावर कोणीही एकट्याने जाऊ नका, किसनने समझोत्यासाठी बोलावले तर वगैरे, सुचेता तू पण”.

अजून काही कोणी शंका काढल्या नाही. भिडेंना मी सहज शेवटचा हफ्ता कितीचा असेल असे वि विचारले.

“सर्वांचे मिळून अंदाजे ऐंशी लाख असावे” भिडे शांतपणे म्हणाले.

म्हणजे फटका जाणवण्या इतपत होता.

---

गुढी पाडवा

दुसऱ्या दिवसापासून मला सुचेताने फोनवर अपडेट करणे सुरू केले. ती अतिशय पद्धतशिरपणे सर्व हाताळीत होती त्यामुळे मी निर्धास्त झालो.

मी राकेशबरोबर बसून कामकाज समजून घेत होतो. फंड आणि इनव्हेस्टमेंट याकरिता एक वेगळा मॅनेजर असावा हे त्याचे मत मला पटले. मी रामू सरांनी दिलेला नंबर त्याला दिला आणि याला ताबडतोब बोलव असे सांगितले. तासाभरात एक तरुण बरोबर घेऊन तो आला पण. "हे मनोज गुप्ता" त्याने ओळख करून दिली. मी किंचित अविश्र्वासाने त्याच्याकडे बघितले.

कारण रामू सरांना गाईड करणारा माणूस जरा प्रौढ असेल असे मला वाटले होते. तसे काही न दर्शवितात मी त्याला विचारले

"तुम्हाला शेअर मार्केटचा किती वर्षाचा अनुभव आहे?"

"पंधरा वर्षाचा" पापणी न लववविता त्याने उत्तर दिले.

"तुमचे वय किती आहे?"

"अठ्ठावीस वर्षे".

"म्हणजे तुम्ही तेरा वर्षाचे असल्यापासून शेअर मार्केट मध्ये आहात?"

"खरेतर जास्त कारण आमच्या चार पिढ्या मार्केटमध्ये आहेत. आमची पेढिपण होती".

तो विषादाने म्हणाला. त्याला त्या कटू आठवणीतून बाहेर आणण्यासाठी मी राकेशला सांगितले की याला आपले कामकाज दाखव नंतर परत बोलू. इकडे ऑफिसमधे मनोज गुप्ता त्याचे रिपोर्ट घेऊन परत एकदा हजर झाला.

"ऑफिस चांगले काम करत आहे पण अजून आक्रमकरित्या काम केले तर उलाढाल तसेच फायदा वाढू शकेल "त्याने जाहीर केले.

"हे तूच करायचे आहे".

"करेन पण माझ्या कामात कोणी हस्तक्षेप करायचा नाही".

"मान्य आहे"

"मला अजुन तीन सहकारी पाहिजेत".

"मिळतील. राकेश तशी जाहिरात दे".

तो खदखदून हसला. "अशी माणसे जाहिरात देऊन मिळत नाहीत. मी ती आणेन. ती कमिशन बेसिसवर काम करतील फक्त कंपनीच्या सवलती व सुविधा त्यांना मिळाव्या".

राकेशला तसा करारनामा करण्यास काहीच अडचण नव्हती. त्याने उलट मलापण एक पी ए नियुक्त करण्यास सुचविले. मनोजला सोमवारी जॉईन होण्यासाठी सांगून मी माझ्या कामाला सुरुवात केली. तेवढ्यात फोन वाजला. फोनवर मुकुल राजासाहेबांचा मुलगा पर्यायाने माझा बॉस होता. प्रथम अभिनंदन करून त्याने त्याने त्याची मोठी काळजी दूर केल्याबद्दल आभार मानले. राजासाब आता आपण थकलो हे मानायला तयार नव्हते त्यामुळे तो काळजीत असायचा.

मी पण त्याला काळजी न करण्यास. सांगितले व वेळोवेळी माहिती देईन असे सांगितले. तेवढ्यात त्याने नवीन स्टाफ घेतेवेळी माझ्यासाठी एक ऑफिस ॲडमिनिस्ट्रेटर पण नियुक्त करण्यास बजावले. त्यामुळे मला राजासाबांकरिता अधिक वेळ मिळेल असे त्याचे म्हणणे पडले.

राकेशला हे कळताच त्याने फक्त भांगडा केला नाही हे माझे नशिब. तो काय धागेदोरे हलवायचा माहीत नाही पण दोनच दिवसांनी या तीन उमेदवारांमधून निवड करायची आहे असे म्हणून त्याने एक फाईल मला दिली. मी नकार देऊ शकलो नाही कारण त्यात एक नाव फ्रेनीचे होते. मला उघडपणे सांगता येत नव्हते म्हणून मी त्याला वेगळ्या पद्धतीने निवड करायला सांगितली. त्याप्रमाणे तिघींनाही दहा मिनिटांच्या अंतराने बोलावण्यात आले. ठरवल्याप्रमाणे मेन गेटपाशी एक पाण्याचा पाईप वाहता ठेवण्यात आला. डोअरमॅट तिरकी करण्यात आली, हॉलधील सर्व लाईट चालू केले, वॉटर कुलर वरील पेले आडवे ठेवले आणि वर्तमानपत्रे पसरून ठेवली. हे राकेश अविश्र्वासाने बघत होता.

“यांनी काय होणार?” त्याने विचारले.

“आपल्याला एकही प्रश्न विचारावा लागणार नाही”.

बघुया असे म्हणून आम्ही दोघे आत जाऊन बसलो. राकेश फ्रेनीला ओळखत असणार किंबहूना त्यानेच तिला अर्ज करण्यास सांगितले असणार याची मला खात्री होती बघू, ही परीक्षा ती कशी देते असे मनात म्हणत मी राकेशबरोबर दुरून बघू लागलो.

ठरलेल्या वेळी पहिली उमेदवार आली. गेटपासून हॉलपर्यंत सर्व पसारा बघत आणि नाक मुरडत सोफ्यावर बसली. दहा मीनिटांनी दुसरी आली तीनी पण पहीलीचाच कित्ता गिरवला. विवेक तुझी आयडिया बहुधा फेल होणार असे म्हणत असताच फ्रेनी आली.

तब्बल सात वर्षाच्या कालावधीनंतर मी तिला बघत होतो. नकळत माझ्या हृदयाची धडधड वाढली. तिने साधा ड्रेस घातला होता, हातात एक फाईल होती. गेटपाशी पाणी वाहतांना दिसताच तिने वॉचमनला बोलावून नळ बंद करायला लावला. दरवाजा ढकलून आत येताच प्रथम डोअरमॅट नीट करून ठेवले. तेवढ्यात एक दुर्दैवी सफाई कामगार नजरेस पडताच तिने अनावश्यक लाईट बंद केले. त्याच्याकडूनच ती कुलरवरचे पेले, वर्तमानपत्रे नीट लावून घेतले तेही गोड बोलून आणि नंतरच ती सोफ्यावर वाट बघत बसली. आधी आलेल्या उमेदवार तोवर आपसात बोलण्यात आणि लिपस्टिक लावण्यात मग्न होत्या. तिने त्यांच्याकडे बघितले पण नाही.

“काय राकेश, फरक दिसला काय?” मी विचारले.

“क्लास अपार्ट”तो उत्स्फूर्त पणे म्हणाला.

आता ती मला ओळखते की काय एवढीच भीती होती. इतर दोघींना जाण्यास सांगून त्याने फ्रेनीला बोलावले. आत येताच मला बघून ती जरा विचारात पडली पण तिने मला ओळखले नाही. तिने फाईल पुढे करताच मी नको असे हातानीच दर्शविले आणि तू सोमवारी जॉईन होऊ शकतेस काय असे विचारले.

“इंटरव्ह्यू न घेताच?” तिने आश्चर्याने विचारताच राजेशने तिला सर्व सांगितले आणि तुझा इंटरव्ह्यू केव्हाच झाला आहे असे हसत सांगितले.

मनोज आणि फ्रेनी हे माझ्या दृष्टीने आवश्यक असलेले मोहरे जमा होताच मी बराच निश्चिंत झालो व शांतपणे गुढीपाडव्याची वाट बघू लागलो. तिकडे सुचेताने चाळीतल्या लोकांना चांगलेच कामाला लावले होते. मी सांगीतलेल्या प्लॅनमधील राहिलेले बारिकसारिक तपशील तिने पूर्ण करीत आणले होते. अखेरीस शनिवार उजाडला. चाळीतले चारही शिलेदार किल्ल्या आणण्यासाठी किसनकडे गेल्याची बातमी तिने दुपारी तीनला मला दिली. आता मात्र मला खरी हुरहुर वाटू लागली. चार वाजता परत तिने फोन करून किल्ल्या फारशी कटकट न करता मिळाल्याचे कळविले. सर्वांना एकएक न पाठवता तुम्हीच चौघे किल्ल्या न्या आणि पूजा झाल्याबरोबर दुपारी चारच्या आत वॉचमनकडे परत करा भिंती, पेंट वगैरे खराब झाला तर याद राखा वगैरे प्रेमळ संवाद झाल्याचे पण तिने सांगितले. आता यापुढचे तुझे काम फार महत्त्वाचे आहे असे मी तिला बजावले व दुसऱ्या दिवसाची वाट बघू लागलो.

रविवारी सकाळीच तिचा फोन आला. शिफ्टिंग पूर्ण झाले आहे. आता आम्ही किसनची वाट बघत आहोत.

“इतक्या लवकर शिफ्टिंग कसे झाले? मी विचारले.

“चाळकरी फारच तयारीचे आहेत. त्यांनी सकाळी चारपासून सुरवात केली. आता फिटिंगची कामे सुरू आहेत”.

“ठीक आहे. काळजी घ्या” असे म्हणून मी फोन ठेवला. आता शेवटचा अंक बाकी होता. तोही वृत्तान्त आठ वाजता तिने कळवला. अपेक्षेप्रमाणे कळल्याबरोबर किसन संतापून आपले चार चमचे कम गुंड घेऊन सोसायटीत आला. त्याच्या नजरेला जे काही पडले ते बघून तो वेडाच झाला. सर्व घराघरात लाईट होते, टीव्ही चालू होते, कूकरच्या शिट्ट्या सुरू होत्या. गेटवर सेवा सहकारी सोसायटी असा मोठा बोर्ड होता. त्याने शोले टाईप आरडाओरडा केला. त्यामुळे चौकडी व काही तरुण खाली आले.

“कायरे थेरड्या, ही काय भानगड आहे” तो भिडे काकांवर ओरडला.

“किसण्या, नीट बोल नाहीतर तंगडं गळ्यात अडकवू” परब भडकून म्हणाले.

“गुमान जागा खाली करा नाहीतर एकेकाला गचांडी धरून बाहेर काढीन” किसन संतापून ओरडला.

“किसन राव तुम्ही यातले काही एक करू शकत नाही कारण ही मंडळी यांच्या नावावर असलेल्या फ्लॅट मध्ये रहातात” सुचेता पुढे येत म्हणाली.

“तू कोण ग भवाने” किसन चिडून ओरडला.

हे ऐकताच दोघेजण त्याच्यावर धाऊन गेले त्यांना हातानीच थांबण्यास सांगून ती शांतपणे म्हणाली “मी यांची वकील, सुचेता पाठक आणि तुमच्या सर्व आरडाओरड्याचे शूटिंग करण्यात आले आहे. पाहिजे असल्यास तुम्ही पोलिसांकडे जाऊ शकता”.

मी काय करायचे ते मला शिकवू नका, आता पोलीसच आणतो म्हणत तो गेला पण त्याचा जोर बराच कमी झाला होता. पंधरा मिनिटात तो पोलीस घेऊन हजर झाला. सुचेतानी चाळकऱ्यांची बाजू समजावून सांगताच आणि सर्व कागदपत्रे दाखवताच त्यांनी किसनची तक्रार पण घेण्यास असमर्थता दाखविली. त्यात भर म्हणून तिने आताच घेतलेला व्हिडिओ दाखवला आणि पोलीस संरक्षणाची मागणी केली. त्यामुळे तर पारडेच फिरले.

किसनराव या असल्या गमजा माझ्या एरियात चालणार नाही. तुमचे काय वाद असतील ते कोर्टात मिटवा. बाई तुम्ही काही काळजी करू नका याचा एक जरी माणूस इथे आला तर मला कळवा असे म्हणून पोलीस पार्टी गेली. त्यांच्या मागोमाग किसन पण जात असता सर्वांनी त्याच्या गाडीमागे किसनच्या **** *** * असा जयघोष केला.

मी तिचे अभिनंदन केले. तिने अर्थात सगळे श्रेय मला द्यायचा प्रयत्न केला. यानंतर आपली बाजू लंगडी असल्यामुळे किसन धमक्या देण्यापलीकडे काही करणार नाही याच्यावर आमचे सहमत झाले. चाळकरी मला भेटू इच्छितात हे तिने बऱ्याचदा सांगितले पण मी ते निग्रहपूर्वक टाळले. त्यांनी तिला पण घसघशित फी दिली. नंतर दोन तीन महिन्यात हे प्रकरण मिटले. सुचेताची वकिली यानंतर जोरात सुरू झाली.

---

शेअर्स युद्ध

मनोज आणि फ्रेनी ऑफिसमध्ये चांगले रुळले होते. फ्रेनीवर मी कॉन्फरन्स रूम अपडेट करायची जबाबदारी टाकली. त्यात व्हिडिओ कॉन्फरनसिंगची पण सोय अंतर्भूत होती. यामुळे कामाचा वेग चांगलाच वाढला. मनोजने गुंतवणुकीचा आलेख चांगलाच उंचावला. तो चांगला स्थिरावला असे बघून मी एक दिवस त्याला बोलावले.

“हिंद फायनान्स आणि केजी बिल्डर्स याबद्दल तुझे काय मत आहे?” मी विचारले.

“दोन्ही कचऱ्याच्या लायकीच्या आहेत” त्याने ठामपणे सांगितले.

“हिंद फायनान्सचा शर्मा कसा आहे?”

“नंबर एकचा लालची आणि हलकट”

“तुला कसे ठाऊक?”

“माझा कस्टमर आहे. मला दस का दम मध्ये दोन पेट्या ( लाख)चुना लावला”.

“हा काय प्रकार आहे?”

“ सकाळी मार्केट सुरू झाल्याबरोबर ऑपरेटर एका शेअरवर इंट्रा डे मध्ये खरेदी करतात आणि दहा वाजता विकतात त्याला दस का दम म्हणतात”.

“तेवढ्या वेळात भाव वाढेलच याची खात्री काय?”

“ऑपरेटर काहीही करू शकतात कारण त्यांची चेन असते आणि गुंतवणूक भरपूर असते”.

“तू पण करतोस?”

“आता नाही”.

“पण शर्माला अडकविण्यासाठी करशील काय?”

“दोन तीनदा त्याचा विश्वास बसेपर्यंत करेन. नंतर मी सांगेन तेथे मी सांगेन तेवढे पैसे तो गुंतवेल. पुढचे काम तुमचे. हे काम वेळखाऊ आहे”.

“ठीक आहे. सुरू तर कर”.

त्यानंतर दोन तीन वेळा मला शर्मा ओझरता येता जाता दिसले. मी पण किसनच्या केजी बिल्डर्सची संपूर्ण माहिती काढू लागलो. कंपनी सुरू होऊन दोन वर्षे झाली होती. भाग भांडवल चार कोटी होते. कंपनी स्टॉक एक्सचेंजवर लिस्टेड होती. गंमतीची गोष्ट म्हणजे कोणताही मोठा प्रोजेक्ट मार्गी लागला नसतांना देखील वाढता फायदा दाखविण्यात आला होता. याचा अर्थ सरळ होता. खोटे हिशोब दाखविण्यात आले होते. अर्थात् हे सर्व त्याच्या आतापर्यंतच्या कीर्तीला साजेसे होते. पंच्यांशी टक्के शेअर्स किसन आणि त्याच्या कुटुंबीयांच्या नावावर होते. शेअर्सची उलाढाल पण फारशी नव्हती. दहा रूपये दर्शनी किंमत असलेला शेअर जेमतेम बारा रुपयावर स्थिर होता. मी परत एकदा मनोजला बोलावले. सर्व माहिती देऊन

त्याला हा शेअर पळवता येईल काय हे विचारले. त्याने पाच दहा मिनिटे विचार केला आणि तो शांतपणे म्हणाला “ते शक्य आहे पण जास्त किमतीवर तो फार टिकणार नाही”.

“मला तो माझे काम होईपर्यंत म्हणजे पाच सहा महिने वर जायला पाहिजे”.

“करता येईल पण आताच खात्री देऊ शकत नाही”.

झाले, हळुहळु त्याने खरेदी वाढवली आणि किंमत वाढू लागली. त्यातच सरकारने बांधकाम क्षेत्रा करिता काही सवलती जाहीर केल्या. यामुळे स्थानिक बिल्डर्सला बराच फायदा होणार हे निश्चित होते. किसनला या कशाशी काही घेणे नव्हते. त्याचे सर्व लक्ष महापालिका निवडणुकीवर होते. एकदा का निवडून आला की तो सरळ नगर विकास समितीवर जाऊन बसला असता मग कोणाचा विकास झाला असता हे सांगायला ज्योतिषाची गरज नव्हती. तसे त्याच्या पक्षात पण त्याचे शत्रू कमी नव्हते.

अखेरीस त्यांना पाहिजे होती तशी संधी किसननेच त्यांना दिली म्हणायला हरकत नाही. एका रिनोव्हेशनच्या केसमध्ये त्याने मूळ मालकाचे अपहरण केले, दमदाटी व मारहाण केली. इतर वेळी त्याच्याकडे दुर्लक्ष झाले असते पण ऐन तिकीट वाटपाच्या वेळी हे प्रकरण झाल्याने श्रेष्ठींना कडक कारवाई करणे भाग पडले आणि किसन पक्षातून दोन वर्षांकरिता निलंबित झाला. ही सुवार्ता येताच मी मनोजला केजी कंपनीत आणखी पाच टक्के हिस्सा वाढव असे सांगितले. त्यामुळे वीस, बावीस रुपयावर रेंगाळणारा केजीचा शेअर सरळ चाळीसला पोचला. आता

फक्त शर्मा याने येथे गुंतवणूक करणे अपेक्षित होते. कधी वर कधी खाली असे करीत हा शेअर तीसला स्थिरावला. मग एक दिवस मनोज शर्मांना घेऊन माझ्याकडे आला.

“विवेक हे आपले एक प्रमुख गुंतवणूकदार शर्माजी” त्याने सुरुवात केली. मी काहीच प्रतिक्रिया दिली नाही. “ते गुंतवणूक वाढवायची म्हणत आहे”.

“मनोज किरकोळ केसेस तूच बघ. कोटीच्या वर असेल तरच मी बघेन. मला आता जरुरी काम आहे”.

“विवेक, फार जुने कस्टमर आहेत. प्लीज “.

“साहेब तुमचा वेळ किमती आहे मान्य आहे पण माझा परतावा वाढेल असे काही सुचवा”.

“काय रे मनोज तो नवीन मल्टी बॅगर का नाही सुचवला यांना?”

“तो मला रिस्की वाटतो”.

“छान, रिस्क कुठे नसते? ते काही नाही त्यांना नीट समजून सांग. रिस्क पण समजावून सांग याउपर त्यांची मर्जी”.

“साहेब तुम्ही काळजी करू नका. मी माझ्या जबाबदारीवर गुंतवणूक करेन. काही झाले तरी तुम्हाला दोष देणार नाही”.

“हे तर आहेच पण तुमच्या सारख्यानी बारिकसारीक गुंतवणूक करण्यापेक्षा एकदाच करून निवांत बसावे असे मला वाटते म्हणून सुचविले. मनोज यांना सर्व कल्पना दे ”.

अर्ध्या तासाने मनोज आला.

“शर्मा फार हुरळून गेले आहेत” त्याने बातमी दिली. “आता केजीमध्ये फक्त खरेदीदार झाले आहेत”.

“आपले थोडे भाव वर नेण्यापुरते विकायला काढ. महिनाभर असेच चालू दे”.

“नंतरचे नंतर बघू. पण शर्मा विकणार नाही हे बघ. ”.

“ते विकणार नाहीतच आणि एकदा पेपर ताब्यात आले की ते आपल्याला भेटणार पण नाही (त्यावेळेस डिमॅट नव्हते. डिमॅट १९९५ला आले) ”.

“हे तर फारच छान झाले” मी आनंदाने म्हणालो.

“काय छान झाले, आपले ब्रोकरेज बुडेल त्याचे काय?” तो वैतागून म्हणाला.

“काही बिघडत नाही. पैसे मिळो न मिळो. त्यांना बिल पाठव, सारखा तगादा कर आणि रेकॉर्ड ठेव” मी म्हणालो “अजून एक महत्वाची माहिती पाहिजे. तुझ्या माहितीचा कोणी शेअरवर कर्ज देणारा आहे काय?.

“गोपाल वर्मा”.

“रेकॉर्ड कसा आहे?”

“बापाकडून पण व्याज घेणार. आतापर्यंत त्याला कोणीही बुडवू शकला नाही. त्याच्याकडे जाणारी पावले खूप आहेत पण त्याकडून येणारे एक पण पावूल दिसत नाही”.

मी मनात म्हणालो जर तो असा वागला नाही तर बालाजीच्या देवळासमोर बसलेला दिसेल.

“पण आजच एवढी माहिती का विचारत आहे?”

“माहिती असावी, वाया जात नाही म्हणून”मी म्हणालो पण ते काही तितकेसे खरे नव्हते कारण संध्याकाळी बिल्डर्स असोसिएशनची मीटिंग होती. तिथे मला आणि राकेशला जाण्यास मुकुलने सांगितले होते. निवडणूक असल्याने किसन मीटिंगला येईल याची मला खात्री होती. माझा एक अंदाज असाही होता की किसन तिथे पाठिंबा तसेच देणग्यासाठी चाचपणी करेल कारण अपक्ष म्हणून उभे राहिल्यास त्याला पैशाची गरज भासणार हे नक्की होते. पूर्वीसारखे नुसत्या वडापाववर प्रचार करणारे कार्यकर्ते आता इतिहासजमा झाले होते. किसन कितीही गब्बर झाला असला तरी निवडणुकीचा खर्च त्याच्या आवाक्यात नव्हता. निवडून आलाच तर तो वसुली करेल तो भाग वेगळा. सभा समाप्त होताच किसन प्रत्येक ग्रुपशी संपर्क साधून चाचपणी करू लागला. त्याबरोबर मी आणि राकेश मुद्दाम त्याला भेटलो.

“दादा, डबल अभिनंदन!” मी सुरुवात केली.

“धन्यवाद, पण डबल कशासाठी”.

“एकतर तुम्ही स्वतंत्र उभे राहायचा निर्णय घेतला म्हणून आणि दुसरा तुमच्या कंपनीचा वार्षिक निकाल फारच छान लागला त्यामुळे शेअर जोरात धावू लागला आहे”.

“ते ठीक आहे पण त्याचा आणि निवडणुकीचा काय संबंध”

“काय दादा गंमत करता होय? जेवढा शेअर जोरात तेवढे तुम्हाला जास्त लोन मिळेल तेही झटपट आणि बिना पेपर. तुम्ही निवडणुकी करता आरामात वापरू शकता. निवडून आल्यावर परत करा. ”

जास्त लोन हे शब्द ऐकताच किसनची उत्सुकता ताणल्या गेली. आम्हा दोघांनाही तो जरा बाजूला घेऊन गेला. मग मी त्याला प्रमोटर त्याचे शेअर्स गहाण कसे ठेवू शकतो, शेअर तेजीत आला तर कसा फायदा होऊ शकेल हे सांगितले. किसनला पाहिजे तेवढे लोन फक्त गोपाल वर्माच देऊ शकतो बाकी येरागबाळ्याचे हे काम नाही हे पण सांगितले. समारोप करते वेळी गोपालच्या अटी जरा जाचक आहेत हे पण सांगितले. लोन घ्यायचे ठरले तर आणखी दोन चार ठिकाणी चेक करा उगाच मी सांगितले म्हणून काही करू नका असे ही बजावले.

“असू दे, गाठ किसनशी आहे आणि तीन महिन्याचा तर प्रश्न आहे “किसन तोऱ्यात म्हणाला “पण तुम्ही भेटला नसता तर मी उगाच तोंड वेंगाडत बसलो असतो. खरच राव तुमच्यासारखा माणूस असोसिएशनचा सेक्रेटरी व्हायला पाहिजे. काय रे राकेश, पुढच्या वर्षी मला आठवण कर आपण तुझ्या साहेबाला सेक्रेटरी करूच बघ”.

“दादा, तुमच्या भावना मी समजू शकतो. आता येतो आम्ही” असे म्हणून आम्ही दोघे निघालो. गाडीत बसल्यावर राकेश मला हळुच म्हणाला “मी लोकांना घोड्यावर बसवणारे खूप बघितले पण माणूस घोड्यावर बसल्यानंतर पण घोड्याला चाबूक मारणारा आजच पाहिला”.

किसन शेअर्सवर कर्ज काढेल की नाही यावर आमचे एकमत नव्हते. दहा ठिकाणी चौकशी केल्याशिवाय तो काही करणार नाही एवढे तर नक्की होते. कामाच्या गडबडीत मी ही गोष्ट विसरून गेलो होतो पण एक दिवस मनोज समोर येऊन बसला. किसनने गोपाल कडून कर्ज घेतले.

“कशावरून?”

“माझ्या मित्राने सांगितले. शेअर पण खाली आला आहे. आता चाळीस चालू आहे”.

“खरेदी वाढव, या महिना अखेरीला साठपर्यंत पोचव”.

“विवेक, हा शेअर फंडामेंटली फार वीक आहे. आपले नुकसान होऊ शकते”.

“फक्त हे दोनच महिने सांभाळ”.

ठीक आहे असे म्हणून तो गेला. नंतरचा महिना प्रचाराची राळ उठविणारा ठरला. किसनने प्रचारात चांगलीच आघाडी घेतली होती. निरनिराळ्या संघटनांनी त्याला पाठींबा जाहीर करणे सुरू केले होते. मिरवणुका, पार्ट्या याची झोड उठली

होती. महिन्याच्या मध्यात मी एका सोमवारी मनोज शेजारी जाऊन बसलो. "काय म्हणतात किसन दादा "मी विचारले.

"गाडी जोरात आहे. शेअर साठला आहे. या वर्षीचा सर्वात जास्त".

"निवडणुक केंव्हा आहे?"

"आजपासून चाळीस दिवसांनी".

"उत्तम, आपले केजीचे सर्व शेअर्स विक".

"काय?"

मी परत सांगितले आणि खाली येऊन एक नंबर फिरवला. त्यादिवशी केजीचा शेअर पन्नासपर्यंत घसरला. गोपालचे नेटवर्क फारच मजबूत असावे कारण त्याने त्याच दिवशी त्याचे सर्व शेअर्स विकले.

दुसऱ्या दिवशी पेपरमध्ये पहिल्या पानावर केजी कंपनीवर इन्कम टॅक्सची धाड अशी बातमी होती. खोटे हिशोब दाखवून नफा फुगवून दाखविला, ठेवी बुडविल्या असे आरोप होते. सेबीने पण याची नोंद घेऊन वेगळी चौकशी समिती नेमली. या बातमीचा विपरीत परिणाम आणि विक्रीचा मारा होऊन शेअर एका दिवसात दहाच्या खाली घसरला.

त्याच दिवशी मनोज चारच्या सुमारास माझ्यासमोर येऊन बसला. "विवेक तुला धाड पडेल हे माहिती होते?"

"नाही. तू कशावरून म्हणतोस? शेअर्स विका म्हणालो म्हणून?"

“इतका योगायोग शेअर मार्केटमधे कधीच नसतो म्हणून”.

“अरे हो, शर्माचा काही पत्ता?”

“घसरगुंडी चालू झाली तेव्हा विचारत होते ठेऊ की विकू म्हणून. मी सांगितले ही तात्पुरती स्थिती आहे नंतर जोरात उसळी मारेल”.

“त्यांचा विश्वास बसला?”

“का नाही बसणार? त्याच दिवशी आपण खरेदी केली होती. ती दाखवताच खात्री पटली”.

“मग आपले नुकसान झाले असेल?”

“नाही झाले. अर्ध्या तासात थोडा भाव वाढताच मी ते विकले”.

मी त्याच्याकडे बघतच बसलो. एव्हढ्या गडबडीत पण हा माणूस नफा तोट्याचे गणित सांभाळत होता. त्यादिवशी मी पूर्ण वेळ त्याच्याबरोबरच काढला. आता केजी कंपनीचे शेअर्स कोणी खरेदी करत नव्हते. गचके देत देत भाव अखेरीस कसाबसा दोन रुपयावर थांबला.

---

<u>पडसाद</u>

इकडे मार्केटबाहेर पण याचे परिणाम झाले. ज्या संघटना किसनला जोरदार पाठिंबा देत होत्या त्या एकदम गप्प झाल्या आणि काहीतर गायब झाल्या. कार्यकर्ते तर भाडोत्रीच होते त्यामुळे दाणा पाणी बंद झाल्यावर ते पण अंतर्धान पावले. जे काही तुरळक होते ते फक्त पूर्ण बरबादीची वाट बघत होते. या सर्व अडचणी कमी होत्या की काय म्हणून त्याची जी दमदाटी व अपहरणाची केस दाबण्यात आली होती ती पण विरोधकांच्या दबावाने रिओपन करण्यात आली आणि किसनला पोलिसांनी अटक केली.

शर्माची स्थिती फारशी वेगळी नव्हती. त्यांच्या हिंद फायनान्सचे गुंतवणूकदार काही सेवा बँकेच्या ठेविदारांसारखे मध्यमवर्गीय, पापभिरू या सदरातले नव्हते. त्यांनी शर्माविरूद्ध तक्रारी तर नोंदविल्याच पण हल्ले सुध्धा सुरू केले. शेवटी जेव्हा पोलिसांनी त्यांना अटक केली तेंव्हा त्यांना हायसे वाटले.

मी मनोजबरोबर बसून हा सर्व आढावा घेत असता फ्रेनी मला शोधत आली मला शिवाजीनगर पोलीस स्टेशन वरून इन्स्पेक्टर देशपांडे यांनी फोन करायला सांगितले आहे असा निरोप तिने दिला. त्याप्रमाणे मी संपर्क करताच त्यांनी पोलीस स्टेशनलाच या. मग सविस्तर बोलू असे सांगितले. मी जायला निघालो. तिथे इन्स्पेक्टर देशपांडे यांच्याशी मी सविस्तर बोललो. नंतर त्यांनी मला चौकशी कक्ष अशी पाटी लिहिलेल्या खोलीत जाण्यास सांगितले. कक्ष म्हणजे एक वीस बाय वीस

फुटाची फक्त एक मोठे टेबल व दोन खुर्च्या असलेली खोली होती. खोलीत एक चाळीस वॅटचा बल्ब मिणमिणत होता. एका खुर्चीवर किसन आणि एका खुर्चीवर खाली मान घालून शर्मा बसले होते. टेबलवर एक वही आणि पेन पडले होते. माझी चाहूल लागताच त्यांनी मान वर करून बघितले. मला बघताच ते चिडून ओरडले "तूच, तूच माझी वाट लावली. मी तुझ्यावर विश्वास ठेवला पण तूच माझा गळा कापला".

किसन पण त्वेषाने म्हणाला "यानेच मला भरीला पाडले आणि शेअर्स गहाण ठेवून कर्ज काढायला लावले ".

मी शांतपणे म्हणालो "शर्मा, सात वर्षांपूर्वी तुम्ही सेवा बँकेत असतांना नरेन जोशीची अशीच वाट लावली होती आठवते काय? त्यानेपण तुझ्यावर विश्वास ठेवला होता. तुम्ही तर त्याचे आयुष्यच उद्ध्वस्त केले त्याचे काय? आणि किसन हे कारस्थान तुझेच होते. तुला पूर्ण हिशोब कळला नाही. तुझा हिशोब नीट ऐक, सेवा बँकेचे बुडवलीले कर्ज दोन कोटी, सेवा सोसायटीने दिलेला दणका ऐंशी लाख, केजी शेअर्सचा फटका दीड कोटी ऐकून व्याजासकट दोन कोटी तीस लाख. कळले काय? बाकी तपशील शर्मा जेलमध्ये रोज समजावून सांगतील"

शर्मा एकदम दचकले आणि भेसूर हसले " हे सर्व तुला कसे माहिती? कोण आहेस तू? तुला काय पाहिजे आहे?"

"मीच नरेन जोशी " मी पेन, वही त्यांच्या पुढे टाकीत म्हणालो" मला फक्त तुमचा कबुलीजबाब पाहिजे आहे".

मी बाहेर येताच फ्रेनी रडतच माझ्याकडे धावत आली आणि मला छातीवर गुद्दे मारीत म्हणाली "नरेन, नरेन एवढे दिवस तू मला कळू पण दिले नाही".

कसाबसा तिचा मारा थोपवित आणि तिला जवळ घेत मी म्हणालो "अग वेडे मी तुझ्याजवळच तर होतो".

---

# समारोप

नंतरच्या घटना अतिशय वेगाने घडल्या. शर्मा आणि किसनवर रीतसर खटला चालविण्यात आला. शर्मांना सात तर किसनला दहा वर्षांची शिक्षा झाली. निकालपत्रात माझा विशेष उल्लेख करण्यात आला आणि निरपराध असतांनाही शिक्षा भोगावी लागली याबद्दल दिलगिरी व्यक्त करण्यात आली.

मी आणि फ्रेनी महिन्याभरातच विवाहबद्ध झालो. राजासाब प्रमुख साक्षीदार होते.

सुचेता पाठक आता सौ सुचेता राकेश देशमुख आहेत. तसेच सूर्या बिल्डर्सच्या कायदेशीर सल्लागार आहेत. वकिली जोरात चालू आहे.

मनोज इनव्हेस्टमेंट हेड म्हणून काम करत आहे. दस का दम वगैरे पूर्णपणे बंद आहे.

सर्व वृत्तांत कळल्यावर सेवा सोसायटीचे सभासद अतिशय खुश झाले आणि त्यांनी आम्हा चौघांचा जाहीर सत्कार केला.

सेवा बँकेच्या थोड्यातरी ठेवीदारांच्या मी कामी पडलो याचे मला समाधान वाटते.

सेवा बँकेची आणि ठेवीदारांची परवड मात्र अजून सुरूच आहे.

---- समाप्त----

**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १२ वे वर्ष. जगदिश खांदेवाले यांचे हे दुसरे पुस्तक.**

जगदिश खांदेवाले यांच्या कथा वास्तवाशी जवळिक साधणाऱ्या, मनोरंजक आणि विषयांचे वैविध्य राखणाऱ्या असतात. ते लिहितात कमी. पण जे लिहितात ते सकस, जोमदार आणि भरीव असते. ते अत्यंत मेहनतीने लिहीलेली आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (१६ पुस्तके), शुभांगी पासेबंद (८ पुस्तके), अविनाश नगरकर (चार पुस्तके), नासा येवतीकर(७), डॉ. स्मिता दामले (९ पुस्तके), डॉ. नितीन मोरे (२४ पुस्तके), अनील वाकणकर (६ पुस्तके), रत्नाकर महाजन (४ पुस्तके), अनंत पावसकर(चार पुस्तके), मधू शिरगांवकर (३), अशोक कोठारे (१० हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (महाराष्ट्राचे मुख्य अभियंता, ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक, ४ पुस्तके), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १२ पुस्तके), विनीता देशपांडे (७ पुस्तके), उल्हास हरी जोशी(६), नंदिनी देशमुख (५), सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(१२), डॉ. नंदिनी धारगळकर(८) संयम बागायतकर(२), मीना खोंड(१), जगदिश खांदेवाले(२) असे अनेक ज्येष्ठ, अनुभवी लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत पोहोचवतात. एकही पैशाची अपेक्षा न ठेवता.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं 'इ'यें । दृष्टादृष्ट विजयें । होआवे